कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | मंगळवार | दि. २४ नोव्हेंबर २०२६ | अंक १६८ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

बिसलेरीचे पाणी आरोग्याला घातक

नवी दिल्ली : बिसलेरीचे पाणी आरोग्याला घातक असून, त्या पाण्यात कॅन्सर होणारी घटक असल्याचा दावा करण्यात आला. एफएसएसएआयने रविवारी (दि.२२) बिसलेरीच्या विरोधात कोर्टात केस चालवण्यास मंजूरी दिली. या बाटलीबंद पाण्याचे नमूने दोनदा चाचणीत फेल झाले आहेत. या तपासणीत ब्रोमेटची पातळी परवानगी असलेल्या प्रमाणापेक्षा जास्त असून, हे पाणी पिण्याच्या लायक नसल्याचे आढळले आहे. कंपनीने यावर आक्षेप घेतला आणि दुसरी चाचणी घेण्यात आली. मात्र, तरीही पाणी असुरक्षित असल्याचे आढळले. पीएएच नावाचे कर्करोग कारक घटक देखील पाण्यात आढळले आहेत.

शेअर बाजारात मोठी घसरण

नवी दिल्ली : भारतीय शेअर बाजारात सोमवारी (दि.२३) मोठी घसरण पाहायला मिळाली. सलग दोन दिवसांच्या तेजीनंतर बाजाराने पुन्हा घसरणीची वाट धरली. मेटल, बँकिंग आणि फायनान्शियल सर्व्हिसेस क्षेत्रातील शेअर्समध्ये झालेल्या विक्रीमुळे प्रमुख निर्देशांक दबावात आले आणि गुंतवणूकदारांचे तब्बल ५.२४ लाख कोटी रुपये बुडाले. सोमवारी दिवसअखेर सेन्सेक्स १,४३८.७२ अंकांनी म्हणजेच १.७७ टक्क्यांनी घसरून ८२,४३५.९९ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी ४५०.९५ अंकांची घसरण नोंदवत २५,३४९.६५ अंकांवर बंद झाला.

शिंदेसेनेला दणका

- खंडाळे उपसरपंचासह दोन सदस्य अपात्र
- ॲड. बाणेंच्या कायदेशीर लढ्याला मोठे यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील खंडाळेग्रामपंचायतीच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. भारतीय जनता पार्टीचे तालुका मध्य सरचिटणीस ॲड. आशिष बाणे यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या अतिक्रमणविषयक अपात्रता प्रकरणात त्यांच्या कायदेशीर लढ्याला मोठे यश मिळाले आहे. अपर जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल असलेल्या वाद अर्जांवर सोमवारी (दि.२३) महत्त्वपूर्ण आदेश पारित करण्यात आले. या आदेशांनुसार खंडाळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रभाकर तुणतुणे, सदस्य स्वाती चिंचकर आणि सुशील वेळे यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. या निर्णयामुळे खंडाळे ग्रामपंचायतीच्या सत्ताकारणाला मोठा धक्का बसला असून, शिंदे गटाला मोठा दणका मिळाला आहे.

ॲड. आशिष बाणे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमणाच्या मुद्द्यावरून खंडाळे ग्रामपंचायतीतील सदस्यांविरोधात कायदेशीर लढा उभारण्यात आला होता. केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप न करता शासकीय अभिलेख, कायदेशीर तरतुदी आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे हा लढा पुढे नेण्यात आला. तसेच, शिवसेना शिंदे गटाचे आमदार दळवी यांच्या समर्थकांचे सदस्य पद रद्द करण्यात यावे, यासाठी अपर जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार अर्ज करण्यात आला होता. या प्रकरणात ॲड. आशिष बाणे आणि ॲड. दीपक नागे यांनी सातत्याने पाठपुरावा करत संबंधित प्राधिकरणासमोर आपली बाजू मांडली. अतिक्रमणाविरोधात केलेल्या या तक्रारीची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली. अखेर खंडाळे ग्रामपंचायतीतील अतिक्रमणाच्या मुद्द्यावरून सुरू झालेला हा संघर्ष निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, खंडाळे ग्रामपंचायतीतील तीन सदस्यांच्या अपात्रतेच्या आदेशाने अलिबागच्या राजकारणात नवे वादळ निर्माण केले आहे. या घडामोडीमुळे शिंदे गटाच्या स्थानिक राजकीय वर्चस्वाला मोठे आव्हान निर्माण झाले आहे. शिंदे गटाच्या स्थानिक राजकीय वर्चस्वाला मोठे आव्हान मिळाले असून, सोन्याच्या लंकेला आग लागल्याची राजकीय चर्चा आता तालुकाभर रंगू लागली आहे.

> हा लढा कोणत्याही व्यक्तीविरोधातील वैयक्तिक संघर्ष नाही. हा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कायद्याचे राज्य, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व टिकवून ठेवण्यासाठीचा लढा आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारात नियमांचे पालन झाले पाहिजे. शासकीय जमिनींचे संरक्षण झाले पाहिजे.कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही, हीच आमची भूमिका आहे. राजकीय दबावापेक्षा कायदेशीर लढाईला महत्त्व देत मिळवलेले हे यश आत्मविश्वास वाढवणारे ठरले आहे.
>
> – ॲड. आशिष बाणे

दरम्यान, ॲड. आशिष बाणे यांनी, हा लढा एका व्यक्तीविरोधातील वैयक्तिक लढा नाही. तर, ग्रामपंचायतीच्या कारभारात नियमांचे पालन आणि शासकीय जमिनींचे संरक्षण होण्यासाठी उभारलेला लढा असल्याचे सांगितले.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

भाजपने 'राजा'ला तुडवले!

रायगडात भाजप-शिंदेसेना वाद विकोपाला

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांच्याविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल रायगड जिल्ह्यातील भाजपच्यावतीने शिंदे गटातील राजा केणी यांच्याविरोधात अलिबागमध्ये निषेध मोर्चा काढण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत त्यांनी राजा केणी यांची प्रतिमा व फलक फाडून घोषणा देत तीव्र निषेध व्यक्त केला. त्यानंतर राजा केणी यांचा बॅनर पायाने तुडवण्यात आला. या प्रकारामुळे महायुती सरकारमध्ये अंतर्गत वाद अधिक पेटल्याचे चित्र आहे.

शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांना टोला

शिवसेना शिंदे गटातील पदाधिकारी यांच्याकडून झालेला प्रकार निंदनीय आहे. सत्तेत असतानाही एकमेकांबद्दल अशा प्रकारचे वक्तव्य करणे नामुष्की आणणारी आणि नेतेमंडळींना न शोभणारी गोष्ट आहे. परंतु, युतीत आणि सत्तेत असताना वरच्या नेत्यांनी काही नियम पाळणे गरजेचे आहे. भाजपच्यावतीने त्यांचा निषेध व्यक्त केला जात असून, सत्तेच्या लालसेपोटी प्रथम स्वतः बाकीचे नंतर अशा वृत्तीचे लोक भाजपच्या वरचढणीला आले आहेत, म्हणून असे प्रकार सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी रस्त्याच्या कामांमुळे दोन जणांचा मृत्यू झाला. तसेच, जिल्ह्यात दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. यावर उपाययोजना करण्याऐवजी नको त्या गोष्टी केल्या जात असल्याचा टोला भाजपकडून शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आला.

भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यामध्ये महायुती आहे. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून शिवसेना आणि राष्ट्रवादीत अंतर्गत वाद सुरु आहेत. ●➤पान ५ वर

वे|ध|क

आरोपीची पाचव्या मजल्यावरून उडी

नवी मुंबई : बेलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात धक्कादायक घटना घडली. २०१९ मध्ये नेरूळ पोलीस ठाण्यात दाखल हत्या आणि हत्येच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात नागेश लाड (३४) याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. निकाल ऐकल्यानंतर तो प्रचंड मानसिक तणावाखाली गेला. न्यायालयीन कक्षाबाहेर आणत असताना त्याने सुरक्षा रक्षकांची नजर चुकवून न्यायालयाच्या पाचव्या मजल्यावरून उडी मारली. तणावातून त्याने उडी मारल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गंभीर जखमी अवस्थेत त्याला अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

बोअरवेलमध्ये पडून बालिकेचा मृत्यू

पंढरपूर : जळोली येथे शेतातील बंद बोअरवेलमध्ये पडलेल्या दीड वर्षीय बालिकेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. उष्मती गावित (१.५ वर्षे) असे या बालिकेचे नाव आहे. रविवारी (दि.२२) रात्रीच्या सुमारास करकंब येथील कांतिलाल नरसाळे यांच्या शेतातील बंद बोअरवेलमध्ये ऊसतोड मजुराची ही बालिका पडली. अंदाजे ४५ ते ५० फूट खोलवर ही बालिका अडकली होती. दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि.२३) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास बचाव पथकाला बालिकेला बोअरवेलमधून बाहेर काढण्यात यश आले. मात्र, या दुर्घटनेत बालिकेचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

'भाजपची दुटप्पी भूमिका'

मुंबई : गुन्हेगारी मानसिकतेला कोणताही धर्म नसतो, ती एक मानवी प्रवृत्ती आहे, त्यामुळे गुन्हेगारांची धर्माच्या आधारावर विभागणी करणे किंवा अपराध्याचा धर्म पाहून त्या धर्माला लक्ष्य करणे, हे भारतीय संविधानाच्या समानता, धर्मनिरपेक्षता आणि बंधुतेच्या मूल्यांच्या विरोधात आहे. मुस्लिम समाजातील एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला तर त्याला 'टाइम बॉम्ब' ठरवायचे आणि इतरांनी गुन्हा केला तर तो 'फुलबाजा' का? असे दुहेरी निकष भाजपकडून जाणीवपूर्वक पुढे केले जात आहेत. असा हल्लाबोल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव सचिन सावंत यांनी केला आहे. कुर्ल्यात तरुण मुलामुलींना काही जणांनी केलेल्या मारहाणीच्या निषेधार्थ ते बोलत होते.

मोरबेच्या पाण्यावर विकासकाचा हक्क कशाला?

| पनवेल | प्रतिनिधी |



- पनवेलकरांसाठी अरविंद म्हात्रे आक्रमक
- ३० एमएलडी पाण्याची मागणी

पनवेलकरांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना मोरबे धरणातील पाणी विकासकाला कशासाठी, असा सवाल उपस्थित करत महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मोरबे धरणातून पनवेलसाठी किमान ३० एमएलडी पाणी उपलब्ध करून द्यावे आणि २०१८ मध्ये एका विकासकाला दिलेली पाणीपुरवठ्याची परवानगी रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली. पालकमंत्री भरत गोगावले यांच्या दालनात सोमवारी झालेल्या विशेष बैठकीत त्यांनी पाणीप्रश्नाचे १७ मुद्दे मांडले. त्यावर पालकमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले.

पनवेल महापालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या आणि तीव्र होत चाललेली ●➤पान ५ वर

वृक्षतोडीविरोधात कर्जतकरांचा कँडल मार्च

| कर्जत/नेरळ | प्रतिनिधी |

प्रस्तावित टोरंट पॉवर जलयुक्त प्रकल्पामुळे सह्याद्रीच्या पर्यावरणावर, जंगलसंपत्तीवर, जलस्रोतांवर आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनींवर होणाऱ्या संभाव्य परिणामांविरोधात कर्जतमध्ये विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, शेतकरी संघटना आणि पर्यावरणप्रेमी संघटना एकवटल्या आहेत. त्यांच्याकडून रविवारी (दि.२२) कर्जत येथे सह्याद्री संरक्षण जनजागृती मोहीम आणि कँडल मार्च आयोजित करण्यात आला.

कर्जत तालुका पर्यावरण बचाव संघर्ष समितीच्या माध्यमातून या कँडल मार्चमध्ये पर्यावरणप्रेमींसह असंख्य कर्जतकर सहभागी झाले होते. सायडोंगरातील



वृक्षतोडीविरोधात संताप व्यक्त करत पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी एकजूट दाखवली. कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आल्याच्या निषेधार्थ येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक असा कँडल मार्च काढण्यात आला. या मोहिमेला कर्जत तालुका पर्यावरण बचाव संघष समिती, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहुजन समाज पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), आजाद समाज पार्टी, शिवसंग्राम तसेच विविध सामाजिक, शेतकरी, पत्रकार, कामगार आणि स्थानिक संघटनांनी पाठिंबा दिला.

मोर्चादरम्यान, निसर्ग, जंगल आणि पर्यावरण वाचवण्यासाठी कर्जतकरांनी शांततेच्या मार्गाने आपला निषेध नोंदवला. यावेळी कर्जत पर्यावरण बचाव समितीचे ॲड. कैलास मोरे यांनी सरकारवर तोफ डागली. ते म्हणाले की, टोरंट प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याकडून कर्जतकरांचे पाणी हिरावून घेण्याचे काम होणार आहे. तसेच, पाली सायडोंगरातील झाडे तोडून सरकार आपले ऑक्सिजन हिरावून घेत असल्याचे ●➤पान ५ वर

रेल्वेतून पडून तरुणाचा मृत्यू

| महाड | प्रतिनिधी |

दिवा-रत्नागिरी पॅसेंजर रेल्वेमधून प्रवास करताना पडल्याने २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना महाड तालुक्यातील कावळे गावाच्या हद्दीत घडली. दीपक रहाटे (२८) असे मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दीपक रहाटे हा दिवा-रत्नागिरी पॅसेंजरमधून प्रवास करत असताना कावळे गावाजवळ अचानक रेल्वेतून खाली पडला. जवळून दुसरी रेल्वे जात असताना त्यांचा तोल गेल्याने ते खाली पडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. ●➤पान ५ वर

आवासच्या यात्रेला भाविकांचा महासागर

- भाविकांनी घेतले नागेश्वराचे दर्शन
- बैलगाड्यांसह आलेल्या शेतकऱ्यांचीही लक्षणीय उपस्थिती



● (छायाचित्र : समीर मालोदे)

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागोबा देवस्थानाच्या दोन दिवसीय यात्रेला यंदा लाखो भाविकांनी गर्दी केली. कार्तिक वैकुंठ चतुर्दशीच्या निमित्ताने रविवारी (दि.२३) या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत शेतकरी आणि कोळी बांधवांसह समाजातील सर्व स्तरांतील भाविकांच्या गर्दीमुळे नागेश्वर मंदिर परिसरात दोन दिवस भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवारी आवास येथील नागोबा मंदिरात आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत पहाटे तीन वाजल्यापासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. त्यामुळे मंदिर परिसरात यात्रेच्या दोन दिवसांत भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले. या यात्रेत अलिबाग तालुक्यासह उरण, करंजा, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते. विशेष म्हणजे, दरवर्षीप्रमाणे यंदाही यात्रेसाठी बैलगाड्या घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. अलिबाग एसटी आगाराच्यावतीने भाविकांसाठी विशेष बससेवा उपलब्ध करण्यात आली होती. तसेच, उरण ते करंजा मार्गावरही वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली होती. त्याचबरोबर दुचाकी, तीनचाकी आणि खासगी वाहनांतूनही मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. या यात्रेनिमित्त मंदिर परिसरात मिठाई, खाद्यपदार्थ, लहान मुलांची खेळणी, कौटुंबिक वापराच्या वस्तूंची विविध दुकाने थाटण्यात आली होती. आकाशपाळणे आणि मनोरंजनाच्या विविध खेळांनी ●➤पान ५ वर

जि.प. कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

हिवाळी अधिवेशनात मोर्चा काढण्याचा निर्णय

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनची रविवारी (दि.२) ऑनलाईन बैठक घेण्यात आली. राज्याध्यक्ष ॲड. बाबुराव पुजरवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आंदोलनाची महत्त्वपूर्ण भूमिका घेतली असून, आगामी हिवाळी अधिवेशनात नागपूरमध्ये मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद कर्मचारी त्यांच्या मागण्यांसाठी तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात असणार आहेत.

शासनाकडे असलेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासन गांभीर्याने पाहात नसल्याची भावना अनेक कर्मचाऱ्यांनी व्यक्त करत, शासनाच्या या उदासीन



धोरणाबद्दल सर्वच कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात झालेल्या बैठकीत, राज्य शासनाकडे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रलंबित मागण्या आहेत. मागण्या मान्य होत नसतील तर जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी काम बंद आणि असहकार आंदोलन करावे, तसेच नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढावा. त्याचबरोबर कनिष्ठ सहाय्यक व वरिष्ठ सहाय्यक यांच्या पदोन्नती स्तराबाबत तात्काळ निर्णय घेण्यात यावा. कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या कामाच्या वाटपाबाबत शासनाने मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करावीत. तसेच, त्यांना वेतनश्रेणी लागू करावी. सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्यांना वर्ग-२ राजपत्रीत पदाचा दर्जा देण्यात यावा. अनुकंपा तत्त्वावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ नियुक्ती देण्यात यावी. तसेच, ज्या कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळाली आहे, त्यांना पूर्वीप्रमाणे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे फेरनियुक्ती देण्यात यावी. जिल्हा परिषदेमध्ये वाहनचालक, शिपाई यांची पूर्वीप्रमाणे भरती करण्यात यावी. कंत्राटी पद्धत रद्द करण्यात यावी. ●➤पान ५ वर

प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण | नगरपरिषद परिसरासह समुद्रकिनारी हरित उपक्रम

वाढदिवसाचा आनंद निसर्गाच्या सेवेत

| अलिबाग | प्रतिनिधी |

माजी नगराध्यक्ष तथा वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अलिबाग नगरपरिषदेच्या प्रशासकीय कार्यालय परिसरात आणि समुद्रकिनारी वृक्षारोपण करण्यात आले. उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, सभापती ॲड. अश्विनी ठोसर आणि नगरसेविका नीलम हजारे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला. वाढदिवसाच्या आनंदाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून हरित अलिबागचा संदेश देण्यात आला.



आनंदाला सामाजिक बांधिलकीची जोड

वाढदिवस म्हटला की शुभेच्छा, सत्कार, हारतुरे आणि आनंदोत्सव असे चित्र सर्वसाधारणपणे पाहायला मिळते. मात्र, अशा आनंदाच्या क्षणांना सामाजिक बांधिलकीची जोड दिल्यास त्या उत्सवाचे महत्त्व अधिक वाढते. प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण उपक्रमातून हाच सकारात्मक दृष्टिकोन दिसून आला. शुभेच्छांच्या माध्यमातून व्यक्त होणारे प्रेम समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक कृतीतून व्यक्त करण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद ठरला.

वाढते शहरीकरण, बदलते हवामान आणि पर्यावरणाचा ढासळता समतोल लक्षात घेता वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. अलिबागसारख्या निसर्गसमृद्ध आणि समुद्रकिनाऱ्याने लाभलेल्या शहरात हरित क्षेत्राचे जतन करणे अधिक महत्त्वाचे आहे. हीच जाणीव ठेवून प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा उपक्रम हाती घेण्यात आला. नगरपरिषदेच्या प्रशासकीय कार्यालय परिसरात वृक्षलागवड करून शासकीय कार्यालयांच्या परिसरात हिरवाई वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर समुद्रकिनारी वृक्षारोपण करून ●➤पान ५ वर

शटडाऊननंतरही नशिबी गढूळ पाणी

- कळंबोलीकरांना मातीमिश्रित, दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा

| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोली परिसरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, तब्बल ३६ तासांच्या पाणीपुरवठा शटडाऊननंतरही नागरिकांना स्वच्छ पाण्याऐवजी गढूळ, मातीमिश्रित आणि दुर्गंधीयुक्त पाणी मिळत असल्याची तक्रार समोर आली आहे. विशेषतः कळंबोली एलआयजी, सेक्टर ३ परिसरातील



नागरिकांना अशा प्रकारच्या पाण्याचा सामना करावा लागत असल्याने सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पाणीपुरवठा ●➤पान ५ वर

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळे, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्रीमती कविता जगदीश मुखी उर्फ कविता संजीव मुखर्जी यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील शेतजमिन मिळकत विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती कविता जगदीश मुखी उर्फ कविता संजीव मुखर्जी यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती /संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
तळे ता.मुरुड.	४०/१३	०-२३-०० ०-५०-०० पो.ख ०-७३-०० एकूण	०-१६

अलिबाग,
दिनांक : २४/११/२०२६

सही/-
(ॲड.संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत आहे, सदर मिळकतीचे विद्यमान मालक शेखर महादेव पाटील, संतोष दिगंबर वारंगे आणि अल्हाद श्रीकृष्ण सावरकर यांचेकडुन आमचे आशिलांनी जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्याबाबत आमचे आशिलांची त्याच्याबरोबर बोलणी सुरु आहे.

मिळकतीचे वर्णन :-

गाव	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (चौ.मी.)	आकार रू. पै.
मौजे.वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड	७/३/४	क्षेत्र १८६ चौ.मी.	०.००

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २४/११/२०२६

सही/-
ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सहाण येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. बाबु नारायण पोईलकर (वगैरे) रा. सहाणगोठी ता. अलिबाग जि. रायगड पो. कुरूळ, ता. अलिबाग जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग क्र.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू.पै.)
सहाण ता. अलिबाग जि. रायगड	२१९	०-३९-५० पो.ख. ०-०२-५० एकुण क्षेत्र ०-४२-००	१०.३७

वर नमुद मिळकतीपैकी श्री. बाबु नारायण पोईलकर वगैरे यांच्या अविभक्त मालकी हिश्श्याच्या भातशेती मिळकतीबाबत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २४/११/२०२६

सही/-
श्री. किशोर वामन तेलंगे
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक आशा पांडुरंग कदम यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलानी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरह् जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे

मौजे गौरकामत ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

भूमापन क्र .	उपविभाग क्र.	क्षेत्र हे. आर पॉ	आकारणी रु. पै.
४	१/ड	०.२०.००	३.१८

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे पोस्टाने पाठवाव्यात अथवा त्यांस संपर्क साधावा.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मूदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २४/११/२०२६

ॲड. शंकेश राजेश ठाकरे
बी. एल. एस. एल. एल. बी,
पत्ता - गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं: ९२८४८९२३८७

जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक गजानन नारायण पाटील वगैरे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी	आकार रू. पै.
मौजे डिकसळ, ता.कर्जत जि. रायगड	२९/२/अ/१	०.५१.९० यापैकी १६ गुंठे	३.६९

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक : २४/११/२०२६

ॲड. उमेश आनंद भगत
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे - बार्डी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक श्री. चारुहास गजानन साळवी यांची सदर मिळकत कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे बार्डी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.

भुमापन क्र.	उपविभाग	क्षेत्र आर.चौ.मी	आकार रू. पैसे
२९	१	०-०८-००	०-०९
३३	१०	०-१२-००	०-१६
३३	११	०-०७-००	०-०६
३३	१२	०-५३-००	०-८१

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क - हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल,
तारीख : २३/११/२०२६

राजेश तुकाराम बांगर
ॲडव्होकेट
पत्रव्यवहाराचा पत्ता- रा. बेंडसे, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबाईल नं. ९१६७४८३८६६.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वाघोडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लालचंद गंगाधर पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रु. पै.)
वाघोडे	१८/१/ब/२	०-२८-०० पो.ख. ०-०४-०० ०-३२-००	०.४५

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २४/११/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील.
अे/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

दिनांक : २४ नोव्हेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्यहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.-आर.-पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
सुनिल हरीश नागपाल	४८	३	०-२९-३०	३	७५
	४८	४	०-१२-१०	१	३७

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २४/११/२०२६

RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG

(Form Z)

Sub: Rule 1 (d-1) of rule 107 of MCS Rules 1961

Possession Notice for Immovable Property

Whereas the undersigned being the recovery officer of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD under the Maharashtra Co-op Society Rule 1961 Issued demand notice date 03/06/2026 calling upon the judgment debtor Shri SAGAR RAMESH PATIL At KHANDALE, PO. Tal Alibag, Dist. Raigad & Shr RAMESH MANIRAM PATIL At KHANDALE, PO. Tal Alibag, Dist. Raigad to repay the amount mentioned in the notice being Rs. 427700/- (Rupee. Four Lakhs TWENTY SEVEN THOUSAND SEVEN HUNDRED ONLY Only) with interest within 15 days from the receipt of the said notice and the judgment debtor failed to repay total amount. The undersigned had issued a notice for attachment dated 20/06/2026 and attached the property described herein below.

The judgment debtor having failed to repay the amount notice is hereby given on the judgment debtor and the public in general that the undersigned has decided to take possession of the property described here below in exercise of powers conferred on him under rule 107(11) (d-1) of the Maharashtra Co-op Society Rules 1961.

The judgment debtor particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property described herein and any dealings with the said property will be subject to the change of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD. ALIBAG, DIST-RAIGAD for an amount of Rs. 427700/- (Rupee. Four Lakhs TWENTYSEVEN THOUSAND SEVEN HUNDRED ONLY) and interest thereon.

Description of the Immovable Property

The House property within Limits of Mauje Khandale Gram Panchayat Khandale No.412 Area 44.88 Sq Mtrs permanent Cement Concrete house with iron sheet roof in the name of Shri Ramesh Maniram Patil

The Z Notice is given to the borrower and guarantor by Register post on 23/11/2026 with signature and office stamp

Mr. K.K. Raut
Special Recovery Officer
RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG

RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG

(Form Z)

Sub: Rule 1 (d-1) of rule 107 of MCS Rules 1961 Possession Notice for Immovable Property

Whereas the undersigned being the recovery officer of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD under the Maharashtra Co-op Society Rule 1961 Issued demand notice date 30/05/2026 calling upon the judgment debtor SMT. SAVITA GHANSHYAM PURASWANI At 302, A Wing, Shivasadan Building, Behind Govt Colony, Chendhare, Po. Tal Alibag, Dist. Raigad & Shri RAJU GHANASHYAM PURASWANI At 301, A Wing, Shivasadan Building, Behind Govt Colony, Chendhare, Po. Tal Alibag, Dist. Raigad to repay the amount mentioned in the notice being Rs. 1180200/- (Rupee. Eleven Lakhs Eihty Thousand Two Hundred Only) with interest within 15 days from the receipt of the said notice and the judgment debtor failed to repay total amount. The undersigned had issued a notice for attachment dated 20/06/2026 and attached the property described herein below.

The judgment debtor having failed to repay the amount notice is hereby given on the judgment debtor and the public in general that the undersigned has decided to take possession of the property described here below in exercise of powers conferred on him under rule 107(11) (d-1) of the Maharashtra Co-op Society Rules 1961.

The judgment debtor particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property described herein and any dealings with the said property will be subject to the change of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD. ALIBAG, DIST-RAIGAD for an amount of Rs. 1180200/- (Rupee. Eleven Lakhs Eihty Thousand Two Hundred Only) and interest thereon.

Description of the Immovable Property

The House property within Limits of Mauje Chendhare Gram Panchayat Tal. Alibag, Dist. Raigad, Residential Flat No. 1934/11, Third Floor, Soniram Residency Building, Shivaji Nagar, Chendhare, Area 463 Sq ft. construction on Sarve No. 3, Plot No. 3,4, Residential Flat in the name of Smt. Savita Ghanashyam Puraswani

The Z Notice is given to the borrower and guarantor by Register post on 23/11/2026 with signature and office stamp

Mr. K.K. Raut
Special Recovery Officer
RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG

जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे वायशेत, ता.अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मिलिंद जगन्नाथ पेढवी यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात विद्यमान मालक व आमचे अशिलांचा कोणताही लेखी करारनामा झालेला नाही.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र	आकार (रू.पै)
वायशेत ता.अलिबाग	५/४	०-०२-८० पो.ख ०-००-२० एकुण क्षेत्र ०-०३-००	०.५५

अलिबाग,
दिनांक- २४/११/२०२६

सही /
ॲड. समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर,
जिल्हा न्यायालय- रायगड,
ता. अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ७७१९९०७२६१

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. दिनेश परशुराम ठमके, श्री.पंकज शांताराम मराडे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे नसरापूर, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे ३३/१७ एकुण ०.२३.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २४/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे मालेगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे अशिल श्री.बारकु नामदेव पाटील यांनी सदरह् मिळकतीचे विद्यमान मालक श्री. वसंत पावणू महाजन यांचे कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

बिनशेती मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नं..	हिस्सा नं./प्लॉट नं.	क्षेत्रफळ आर.चौ. मी.	आकार रुपये-पैसे
७२	६	४.७३.००	०९.४६

वरील वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पूराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २४/११/२०२६

सही /-
ॲड. पूजा गणेश म्हसे
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

नि ८/ड
ॲड. मोहम्मदरजा म. शेख
अर्जदाराचे वकील ॲड. पूजा महेश शिंदे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय

दि.चौ.अ.क्र. १४७४/२०२६

१. श्री. सय्यद इफ्तेकारअली खान खादरअली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी,
२. श्री. सय्यद असरार अली खान सरदार अली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी,
३. श्री. सय्यद बशारत अली खान सदरुद्दीन अली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी,
४. श्री. सय्यद मन्सूर अली खान मकदूम अली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी,
५. श्री. सय्यद सरफराज अली खान दरवेश अली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी,
६. श्रीमती सय्यदा समीना कौसर सय्यद मुख्तार अली
सज्ञान, भारतीय रहिवासी,
७. श्रीमती सय्यदा सीमा बेगम सय्यद मुख्तार अली
सज्ञान, भारतीय रहिवासी,
८. श्री. सय्यद बासित अली सय्यद मुख्तार अली
सज्ञान, भारतीय रहिवासी,
९. श्री. सय्यद काशिफ अली मुख्तार अली
सज्ञान, भारतीय रहिवासी,
१०. श्री. सय्यद अहमद अली मुख्तार अली
वय सुमारे ३९ वर्षे, व्यवसाय : व्यापार,
११. श्रीमती सय्यदा कनीझ जहरा बासित उमर खान
(पूर्वाश्रमीच्या सय्यदा कनीझ जहरा मलिक हुसेन खान)
सज्ञान, भारतीय रहिवासी,
१२. श्रीमती सय्यदा कनीझ मुस्तफा अहमद
(पूर्वाश्रमीच्या सय्यदा कनीझ निजामुद्दीन अली खान)
सज्ञान, भारतीय रहिवासी,
१३. श्री. मीर असद अली खान मीर ताहेर अली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी,
१४. श्री. मीर अन्वर अली खान मीर अकबर अली खान
सज्ञान, भारतीय रहिवासी
सर्व अर्जदार १ ते १४ यांचे तर्फे कुलमुखत्यार
श्री. फरहान इशाक कच्छी
वय सुमारे ४६ वर्षे, व्यवसाय : व्यापार,
ऑफिस : ऑफिस नं. १, कुमार पॅव्हेलियन,
घर नं. २४२४, ईस्ट स्ट्रीट, कॅम्प, पुणे- ४११००१ अर्जदार

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ ते १४ यांनी त्यांचे कुलमुखत्यार श्री.फरहान इशाक कच्छी यांचेमार्फत या मे.न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८ सन १८२७ अन्वये वारस दाखला (Certificate of Heirship) मिळणेकामी वरील क्रमांकाचा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदारांचे कथन असे आहे की, कै. सय्यद सरदार अली खान यांचे दिनांक ०१/११/१९४२ रोजी कमाल नगर, हैदराबाद, तेलंगणा येथे निधन झाले. ते सुन्नी मुस्लिम असून, त्यांच्या पश्चात ९ मुलगे व ३ मुली असे कायदेशीर वारस होते. मुस्लिम कायद्यातील हनाफी वारसा तत्त्वांनुसार सदर वारसांना प्राप्त होणाऱ्या हिश्श्यांनुसार संबंधित मिळकतींमधील अविभक्त हक्क, मालकी व हितसंबंध त्यांच्याकडे आले. सदर वारसांपैकी संबंधित व्यक्तींच्या वारसांमार्फत अर्जदारांचा दावा असून, अर्जदारांनी इतर सहवारसांसह सदर मिळकतींमध्ये अविभक्त हिस्स्याचा हक्क असल्याचा दावा केला आहे. अर्जदारांचा सदर मिळकतींमधील हक्क व हिस्सा यासंबंधीचा दावा हा मा. न्यायालयात दाखल केलेल्या वारस दाखला अर्जातील मजकूर, वंशावळ व संबंधित कागदपत्रांनुसार आहे.

जमीन मिळकतींचे वर्णन

अ) मौजे वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड (पनवेल महानगरपालिका हद्द; उपनिबंधक कार्यालय : पनवेल)

अ.क्र.	सर्व्हे नंबर	क्षेत्र	आकारणी
१	४२७/१	३९ हे. ८४ आर	रु.९२.६९
२	४३६/१	१०१ हे. ३६ आर	रु.२३५.८१
३	४३८	० हे. २८ आर	रु.०.००
	एकूण	१४१ हे. ४८ आर	

ब) मौजे पाटणोली (पूर्वीचे पाटध्वी), ता. पनवेल, जि. रायगड (पनवेल महानगरपालिका हद्द; उपनिबंधक कार्यालय : पनवेल)

अ.क्र.	सर्व्हे नंबर	क्षेत्र	आकारणी
१	६	२८९ हे. ९७ आर/ पो.ख. ५३ हे. ७० आर	रु. ४६३.९४
२	२३	०१ हे. २० आर	रू. १.२०
३	३४	२२ हे. २२ आर/ पो.ख. ०४ हे. १६ आर	रू. ४३.८७
	एकूण	४२९ हे. ११ आर	

वरील अर्जदार हे कै. सय्यद सरदार अली खान यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यास वारस दाखला देणेबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकिलांमार्फत त्यांची हरकत सदरील जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या ना. कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहित धरून ना. क

निवडक



पेन्शनधारकांची धावपळ थांबणार

पाली/बेणसे : निवृत्तीवेतन सुरू ठेवण्यासाठी दरवर्षी जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची निवृत्तीधारकांची धावपळ आता थांबणार आहे. शासनाने पेण उपकोषागार कार्यालयातच ऑनलाइन जीवन प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असून, अवघ्या पाच ते दहा मिनिटांत ही प्रक्रिया पूर्ण होत आहे. या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन उपकोषागार अधिकारी वैशाली शिर्के यांनी केले आहे. पेण पोलीस ठाण्याच्या आवारातील उपकोषागार कार्यालयात ही सुविधा उपलब्ध आहे. यासाठी निवृत्तीधारकांनी आधारकार्ड, पीपीओ क्रमांक किंवा आदेशाची प्रत, मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी आणि पेन्शन खात्याचे बँक पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे. संबंधित निवृत्तीधारकाची प्रत्यक्ष उपस्थिती बंधनकारक असून, डोळ्यांचे स्कॅनिंग व ओटीपीद्वारे ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण केली जाते. जीवन प्रमाणपत्राची प्रतही तत्काळ उपलब्ध करून दिली जाते. या कामासाठी उपकोषागार अधिकारी वैशाली शिर्के, उपलेखापाल सुनीता म्हात्रे, लिपिक राजेंद्र कशाळे आणि शरद जाधव कार्यरत आहेत. पेण तालुक्यातील निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



पोशीर धरणाविरोधात एल्गार

नेरळ : कर्जत तालुक्यात कर्जत पर्यावरण बचाव समिती आणि शिवसेना ठाकरे पक्षाने पोशीर बोरगाव धरणाच्या विरोधात सह्यांची मोहीम हाती घेण्यात आली होती. पोशीर धरण होत असलेल्या कळंब येथे सह्यांची मोहीम घेण्यात आली. या सह्यांच्या मोहिमेत पोशीर धरण परिसरातील शेकडो शेतकरी आणि ग्रामस्थ यांनी सह्या करून ही मोहीम यशस्वी केली. आम्हाला कोणत्याही परिस्थितीत धरण नकोय, आमची जमीन आम्ही देणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. कळंब येथे पोशीर धरणग्रस्तांनी धरणाला विरोध केला आहे. या धरणाच्या विरोधात सर्वत्र संतापाचे वातावरण असून, कर्जत तालुका पर्यावरण बचाव समिती आणि शिवसेना ठाकरे पक्षाने सह्यांची मोहीम हाती घेतली होती. या सह्यांच्या मोहिमेत कळंब येथे बोरगाव ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी ही सह्यांची मोहीम राबवली. बोरगाव शेतकरी मंडळ यांच्याकडून मोठा सहभाग दाखवत ही मोहीम यशस्वी केली. शिवसेना पक्षाचे जिल्हा विभाग प्रमुख लक्ष्मण पोसाटे, पंचायत समिती विभाग प्रमुख विजय बदे तसेच विभाग सचिव रामदास ठोंबरे, विवेक डायरे, अरूण खाडे, बाला मानकामे, बोरगाव ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर पोशिर धरण हटाव समिती अध्यक्ष तानाजी चौधरी, एकनाथ चौरे, ललील धस तसेच प्रभाकर खडेकर, नंदू खडेकर,राजेंद्र डोंगरे, दत्ता खडेकर, रामदास पाटील यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे ही सह्यांची मोहीम यशस्वी ठरली.

शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करात सवलतीचे संकेत

माणगाव : शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांना मालमत्ता कराच्या आर्थिक भारातून दिलासा मिळण्याची शक्यता निम र्ण झाली आहे. राज्याच्या नगरविकास विभागाने २० नोव्हेंबर रोजी महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी करून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना दिले आहेत. त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या मालमत्ता कराचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. विधानमंडळात उपस्थित झालेल्या तारांकित प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर शासनाने हे परिपत्रक जारी केले आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने १ मार्च २०२१ रोजी दिलेल्या आदेशाचा संदर्भ देण्यात आला आहे. धार्मिक, धर्मादाय आणि शैक्षणिक कारणांसाठी वापरल्या जाणाऱ्या इमारतींना करसवलत देण्यासंदर्भातील न्यायालयीन निर्देशांची राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी काटेकोर अंमलबजावणी करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे. मात्र, या परिपत्रकामुळे सर्व शैक्षणिक संस्थांना सरसकट मालमत्ता करमाफी मिळणार असल्याचा अर्थ होत नाही. संबंधित कायदे, नियम आणि शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार पात्र संस्थांनाच सवलतीचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. शैक्षणिक संस्थांना इमारतींची देखभाल, कर्मचारी वेतन आणि पायाभूत सुविधांसाठी मोठा खर्च करावा लागतो. अशा परिस्थितीत पात्र संस्थांना मालमत्ता करात सवलत मिळाल्यास त्यांचा आर्थिक भार कमी होऊन शैक्षणिक सुविधांच्या विकासाला मदत होऊ शकते. त्यामुळे शासनाच्या परिपत्रकाची स्थानिक स्वराज्य संस्था कशा प्रकारे अंमलबजावणी करतात आणि पात्रतेचे निकष काय असतील, याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जाहिरात कंपनीची मनमानी!

पालिकेच्या आदेश झुगारुन मैदानात काम सुरू; जॉगिंग ट्रॅकचे नुकसान, प्रशासन हतबल?

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

कळंबोली वसाहतीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मैदानात जॉगिंग ट्रॅकचे नुकसान करून अवाढव्य जाहिरात फलक उभारण्याचे काम सुरू असल्याचा प्रकार समाजसेवक प्रशांत रणवरे यांनी उघडकीस आणला होता. विशेष म्हणजे, पालिका प्रशासनाची अधिकृत परवानगी नसतानाही हे काम सुरू असल्याची बाब त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर जागे झालेल्या पनवेल महानगरपालिका प्रशासनाने तातडीने काम थांबवण्याच्या सूचना देत संबंधित जाहिरात कंपनीला नोटीस बजावण्याचे आश्वासन दिले



होते. मात्र, पालिकेच्या सूचनांना केराची टोपली दाखवत जाहिरात कंपनीने दुसऱ्याच दिवशी पुन्हा काम सुरू केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जाहिरात कंपनीला पालिका प्रशासनाचा धाक उरला आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

कळंबोलीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मैदान हे परिसरातील नागरिकांसाठी व्यायाम, जॉगिंग आणि खेळाचे महत्त्वाचे ठिकाण आहे. या मैदानातील जॉगिंग ट्रॅकला लागून अवाढव्य जाहिरात फलक उभारण्यासाठी काम सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे जॉगिंग ट्रॅकचे नुकसान होत असून नागरिकांच्या सार्वजनिक सुविधेवरच गदा येत असल्याचा आक्षेप प्रशांत रणवरे यांनी घेतला आहे. विशेष म्हणजे, मैदानाच्या जागेवर जाहिरात फलक उभारण्यास नियमांनुसार प्रतिबंध असताना संबंधित कंपनीकडून हे काम कशाच्या आधारे सुरू आहे, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

रणवरे यांनी हा प्रकार पालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्यानंतर परवाना विभागाने तातडीने हालचाली केल्या. परवाना विभागाचे अधिकारी मधुकर पिचड यांनी जाहिरात कंपनीशी संपर्क साधून काम थांबवण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच संबंधित कंपनीला नोटीस बजावण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले होते. मात्र, या सूचनांनंतरही कंपनीने काम पुन्हा सुरू केल्याने पालिकेच्या आदेशांचे पालन होत नसल्याचे चित्र दिसत आहे.

दरम्यान, यासंदर्भात परवाना विभागाशी संपर्क साधला असता संबंधित ठिकाणचे काम तातडीने थांबवण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली. मात्र, केवळ तोंडी सूचना आणि नोटीस बजावण्याच्या आश्वासनापुरतीच कारवाई मर्यादित राहणार की प्रत्यक्षात काम बंद करून संबंधित कंपनीवर दंडात्मक कारवाई होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कारवाई होणार का?

महाराष्ट्र शासनाच्या ९ मे २०२२ च्या जाहिरात धोरणात सार्वजनिक क्रीडांगणे, मैदाने आणि उद्यानांसारख्या मोकळ्या जागांमध्ये जाहिरात फलक उभारण्यास प्रतिबंध आहे. पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध जाहिरात फलक नियमावलीतही या धोरणाचा संदर्भ देण्यात आला आहे. असे असताना मैदानाच्या जागेवर जाहिरात फलक उभारण्याचे काम सुरू कसे झाले? याला परवानगी कोणी दिली? आणि यापूर्वी अशा जागांवर उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांवरही पालिका प्रशासन कारवाई करणार का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

चापडीच्या शेतकऱ्यांची एकजूट कायम

| माणगाव | प्रतिनिधी |

रोजगारासाठी तरुणाईने गाव सोडले, शेतीसमोर संकटांचा डोंगर उभा राहिला, काळ बदलला आणि पिढ्याही बदलल्या; मात्र माणगाव तालुक्यातील चापडी गावाने एकजुटीचा वारसा सोडलेला नाही. तब्बल ५० ते ६० वर्षांपासून येथील शेतकरी एकमेकांच्या साथीने सामुदायिक शेती करीत असून, 'एकीचे बळ, मिळते फळ' ही म्हण प्रत्यक्षात जगून दाखवत आहेत.

चापडीतील सामुदायिक शेतीची परंपरा पूर्वजांनी सुरू केली. गावातील एकाच्या शेतात काम असले तरी इतर शेतकरी मदतीसाठी धावून जातात. एकाचे काम म्हणजे संपूर्ण गावाचे काम, या भावनेतून



● (छायाचित्र : सलीम शेख)

■ ५० ते ६० वर्षांपासून सामुदायिक शेतीची परंपरा

आहेत. रोजगारासाठी तरुणांना मुंबई, पुण्यासारख्या शहरांकडे स्थलांतर करावे लागत आहे. तरीही गावातील तरुणांना शेतीपूरक व्यवसाय, आधुनिक शेतीचे प्रशिक्षण, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध झाल्यास या परंपरेला अधिक बळ मिळू शकते.

आजच्या स्वार्थकेंद्री जीवनशैलीत चापडीच्या शेतकऱ्यांनी जपलेली ही एकजूट समाजासाठी प्रेरणादायी आहे. कारण शेतीतून धान्य पिकते; पण एकजुटीतून माणुसकी पिकते, हेच चापडी गावाने गेल्या पाच-सहा दशकांत सिद्ध केले आहे.

पिढ्या बदलल्या; वारसा कायम

५० ते ६० वर्षांपूर्वी पूर्वजांनी सुरू केलेली सामुदायिक शेतीची परंपरा आजही अखंड सुरू आहे. एकाच्या शेतातील काम म्हणजे संपूर्ण गावाचे काम, ही भावना येथील शेतकऱ्यांनी जपली आहे. संकटे कितीही आली तरी एकमेकांच्या साथीने उभे राहण्याचा चापडीचा हा वारसा ग्रामीण समाजाला एकजुटीचा संदेश देणारा आहे.

अतिक्रमणांवर कारवाईसाठी स्वतंत्र पथकप्रमुख

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

कामोठे परिसरातील वाढत्या अतिक्रमणांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पनवेल महानगरपालिका प्रशासनाने स्वतंत्र अतिक्रमण पथकप्रमुखांची नियुक्ती केली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शाखाप्रमुख अक्षय मेघा संजय ननावरे यांनी यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीची दखल घेत प्रशासनाने कामोठे प्रभाग क्षेत्रासाठी विजय गावडे आणि संतोष पाटील यांची अतिक्रमण पथकप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे.

कामोठे परिसरातील विशेषतः सेक्टर १९ आणि २१ मध्ये अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या आणि दुकानदारांचे अतिक्रमण वाढत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात होत्या. पदपथांवर अतिक्रमण झाल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा मिळत नसून नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.

त्यामुळे या अतिक्रमणांवर नियमित कारवाई करण्यासाठी स्वतंत्र पथकप्रमुखांची नियुक्ती करावी, अशी मागणी अक्षय ननावरे यांनी पनवेल महानगरपालिका प्रशासनाकडे केली होती.



साबण बनविणे कार्यशाळा उत्साहात

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील जीवनधारा संस्था कोलाड यांच्या वतीने साबण बनविण्याची कार्यशाळा दि. २२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

या कार्यशाळेची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. विविध कृतीतून साबण तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी साधन व्यक्ती म्हणून विरार (मुंबई) येथून आलेल्या शिल्पा कोलगे यांनी विविध कृती आणि कौशल्ये यांच्या माध्यमातून साबण कसा तयार होतो याबाबत माहिती देऊन प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून नीम, हनी, कॉफी, बेबी व चारकोल असे पाच प्रकारचे साबण तयार करून दाखवले. त्याचप्रमाणे कोणते साबण कशासाठी वापरायचे, पॅकिंग कशी करायची व सेल कसे करायचे याचीही माहिती देण्यात आली.

माथेरानमध्ये आठवड्यातून दोन दिवस पाणीकपात

नेरळ-कुंभे येथून पाणीपुरवठा सुरू; २३ नोव्हेंबरपासून नवे वेळापत्रक लागू

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमधील दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या निर्णयाला ग्राम स्थांनी विरोध केल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने माघार घेतली आहे. आता शहरात आठवड्यातून केवळ दोन दिवस पाणी कपात केली जाणार असून, २३ नोव्हेंबरपासून नवे वेळापत्रक लागू झाले आहे. नेरळ-कुंभे येथील उल्हास नदीवरील पंप दुरुस्त करून पाणीउपसा सुरू करण्यात आल्याने माथेरानवरील पाणीटंचाईचे संकटही काही प्रमाणात दूर झाले आहे. शनिवार आणि रविवार या दोन दिवशी कोणतीही पाणी कपात केली जाणार नाही.

माथेरानमधील पाणीपुरवठ्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आहे. प्राधिकरणाने



दिवसाआड पाणीपुरवठ्याचे नियोजन जाहीर केल्यानंतर पर्यटन व्यवसायावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत ग्रामस्थांनी विरोध केला होता. नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी आयोजित केलेल्या ग्रामस्थांच्या सभेत उल्हास नदीतून दररोज पाणी उपसा करावा आणि उन्हाळी पर्यटन हंगाम ासाठी शार्लोट लेकचे पाणी राखीव ठेवावे, अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर उपअभियंता स्वप्नील सुळे यांनी कुंभे येथील नादुरुस्त पंप तातडीने दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार पंप दुरुस्त करून पाणी उपसा सुरू करण्यात आला आहे. माथेरानला दररोज सुमारे २० लाख लिटर पाण्याची गरज असून, पर्यटन हंगामात ही मागणी ३५ लाख लीटरपर्यंत जाते. त्यामुळे शार्लोट लेकचे पाणी पर्यटन हंगामासाठी राखीव ठेवण्याचे नियोजन आहे.

पाणीकपातीचे वेळापत्रक

सोमवार आणि बुधवार : मुस्लिम मोहल्ला, वाल्मिकी नगर, पार्क व्ह्यू पॉईंट नवीन, मंकी पॉईंट, दस्तुरी, बाजार पीव्हीसी, इंदिरा नगर, ऑलिम्पिया एसी.

मंगळवार आणि गुरुवार : ऑलिम्पिया मेन, पार्क व्ह्यू पॉईंट जुना, मार्केट, कोतवाल नगर, पंचवटी नगर, रोहिदास नगर, छत्रपती शिवाजी महाराज रोड, ऑलिम्पिया पीव्हीसी. शनिवार आणि रविवार : पाणी कपात नाही. नवीन वेळापत्रकाची अंमलबजावणी : २३ नोव्हेंबरपासून.

काळ नदीतील तवंग हटविण्याचे काम सुरू

| माणगाव | प्रतिनिधी |

काळ नदीतील लालसर तवंग, घटती पाणीपातळी आणि खांदाड परिसरात आढळलेले काविळीचे रुग्ण यामुळे माणगावकरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नदीतील तवंग हटविण्यासाठी नगरपंचायतीने दोन होड्या कामाला लावल्या असून, काळ प्रकल्पातून नदीत पाणी सोडण्याचे निर्देश पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिले आहेत. दरम्यान, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शहरात घरोघरी सर्वेक्षणही करण्यात येणार आहे.

पालकमंत्री भरत गोगावले यांनी १९ नोव्हेंबर रोजी काळ नदीची पाहणी करून नदीची पाणीपातळी



वाढविण्यासाठी काळ प्रकल्पातून पाणी सोडण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पाणी सोडण्याची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष पाणी कधी सोडले जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे आणि मुख्याधिकारी संतोष माळी यांनी काळ नदी तसेच गोद नदी परिसराची पाहणी केली. नदीच्या पृष्ठभागावरील लालसर तवंग हटविण्यासाठी दोन होड्यांच्या माध्यमातून काम सुरू करण्यात आले आहे. तसेच प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. नगरपंचायतीच्या माहितीनुसार, जलशुद्धीकरण केंद्रात क्लोरीन पावडर आणि तुरटीचा वापर करून पाण्यावर प्रक्रिया केली जाते. पाण्याचे नमुने दररोज तपासले जात असून, चाचण्यांमध्ये चिंताजनक बाब आढळलेली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तरीही नागरिकांनी खबरदारी म्हणून पाणी उकळून व गाळून प्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.नदीच्या प्रदूषणाचे मूळ कारण शोधून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असून, स्वच्छ पाणी आणि नागरिकांच्या आरोग्याला प्रशासनाने प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



विकासाच्या झगमगाटात चराईची जागा हरवली

जेजुरीहून आलेल्या मेंढपाळांची व्यथा

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेलमध्ये विमानतळ, टोलेजंग इमारती आणि मोठमोठे रस्ते उभे राहात असताना पारंपरिक मेंढपाळी व्यवसाय मात्र अडचणीत सापडला आहे. वाढत्या नागरीकरणामुळे मोकळी मैदाने आणि शेतजमिनी कमी झाल्याने मेंढ्यांना चारायचे कुठे, असा प्रश्न जेजुरीहून येणाऱ्या मेंढपाळांसमोर उभा राहिला आहे. 'यंदा आलो, पण पुढच्या वर्षी पुन्हा यायचे की नाही?' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात भातशेतीची कामे संपल्यानंतर घाटमाथ्यावरील मेंढपाळ मेंढ्यांचे कळप घेऊन पनवेल परिसरात दाखल होतात. कापणीनंतर शेतात उरणारे गवत आणि मोकळ्या जमिनी यामुळे मेंढ्यांच्या चाऱ्याची सोय होत असे. मेंढ्यांच्या लेंडीपासून शेताला नैसर्गिक खत मिळत असल्याने शेतकरीही त्यांना सहकार्य करीत होते.

मात्र, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू, औद्योगिक प्रकल्प, नवीन रस्ते आणि गृहसंकुलांच्या विस्तारामुळे शेतीचे क्षेत्र आणि मोकळ्या जागा झपाट्याने कमी होत आहेत. परिणामी, मेंढ्यांना चराईसाठी जागा शोधताना मेंढपाळांची दम छाक होत आहे. वाढती वाहतूक आणि बांधकामांमुळे कळप घेऊन जाणेही कठीण बनले आहे.

'पूर्वी गावोगावी शेतजमिनी आणि मोकळ्या जागा होत्या. शेतकरी मुक्कामासाठी जागा देत असल्याने चाऱ्याची अडचण येत नव्हती. आता सर्वत्र इमारती आणि रस्ते दिसतात. यंदा आलो आहोत; मात्र पुढच्या वर्षी यायचे की नाही, याचा विचार करावा लागणार आहे,' अशी व्यथा मेंढपाळांनी मांडली.

पोलीस उपअधीक्षक प्रसाद गोकुळे यांची ग्वाही | **बालहक्क सप्ताहानिमित्त बैठक**

बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्नशील

| नागोठणे | प्रतिनिधी |

बालविवाहामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे परिसरात कुठेही अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह होत असल्याची माहिती मि ळाल्यास ते तातडीने रोखण्यासाठी प्रयत्न करा. बालविवाह पूर्णपणे बंद करण्यासाठी पोलिसांचे शंभर टक्के प्रयत्न राहतील, अशी ग्वाही रोह्याचे पोलीस उपअधीक्षक प्रसाद गोकुळे यांनी दिली. बालहक्क सप्ताहानिमित्त सोमवारी (दि. २३) नागोठणे पोलीस ठाण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

प्रत्येक बालकाला शिक्षणासह मूलभूत हक्क आणि आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे आहे.



● (छायाचित्र : महेश पवार)

बालकांवरील अत्याचारांच्या घटनांची माहितीही तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन गोकुळे यांनी केले. यावेळी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी बालविवाह रोखण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. बालविवाहाची माहिती देणाऱ्यांची नावे गोपनीय ठेवली जातील. त्यामुळे अशी घटना निदर्शनास आल्यास पोलिसांना किंवा १०९८ आणि ११२ या हेल्पलाइन क्रमांकांवर माहिती द्यावी. आपल्या परिसरात बालविवाह होऊ देणार नाही, अशी शपथही प्रत्येकाने घ्यावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

पळस ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच निष्ठा विचारे यांनी पळस आदिवासी वाडीत जनजागृती कार्यक्रम घेण्याची सूचना केली. आदिवासी वाड्यांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक असल्याने नागोठणे परिसरातील सर्व वाड्यांमध्ये टप्प्या-टप्प्याने जनजागृती करण्याचे बैठकीत ठरले. आगामी दत्तजयंती उत्सव आणि वर्षअखेरीस होणाऱ्या कार्यक्रमांबाबतही यावेळी सूचना देण्यात आल्या. सण-उत्सव शांततापूर्वक साजरे करण्याचे आवाहन केले.

बैठकीला सामाजिक कार्यकर्ते अकबर पठाण, आसिफ मुल्ला, ग्रामपंचायत सदस्या शबाना मुल्ला, पूनम काळे, महिला दक्षता समितीच्या निलोफर पानसरे, राजश्री टके, अपर्णा सुटे, संगीता पोलसानी, मंजुळा म्हात्रे, पोलिस कर्मचारी स्वप्निल भालेराव, हरेश धामणे, मनोज वाघमारे यांच्यासह शांतता समितीचे सदस्य, पोलीस पाटील आणि पत्रकार उपस्थित होते.

रेशनमधील दरोडा

गरिबांना मदत करणे, त्यांना हात देणे हे कोणत्याही कल्याणकारी सरकारचे कर्तव्यच असते. पण ही मदत सत्पात्री पडते आहे ना यावर लक्ष ठेवणे हीदेखील सरकारची जबाबदारी असते. पण लोकशाहीमध्ये निवडणुका जिंकण्यासाठी काही वेळेला अनावधानाने अपात्री मदतीकडे दुर्लक्ष केले जाते. तर अनेकदा जाणीवपूर्वक अपात्र लोकांना मदत केली जाते. नरेंद्र मोदी हे कधी काळी न खाऊंगा न खाने दूंगा असे म्हणाले. लोकांच्या मनात तीच त्यांची प्रतिमा ठसवण्यात भाजपच्या प्रचारी टोळ्यांनी कसूर सोडली नाही. पण आज त्याच मोदी सरकारच्या योजनांमध्ये खाणाऱ्या भ्रष्टाचाऱ्यांकडे आणि हात मारणाऱ्या चोरांकडे डोळेझाक केली जात आहे. किंबहुना, मते मिळवण्यासाठी हा जाणूनबुजून घातलेला घाट आहे अशीही शंका यावी अशी एकूण स्थिती आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना नावाची रेशनवर फुकट धान्य देण्याची एक योजना बरीच व बराच काळ गाजते आहे. भाजपवाल्यांना मोदींचा हा मास्टरस्ट्रोक वाटतो. कारण यातून देशातील १४० कोटींपैकी जवळपास ८० कोटी लोकांना दर महिन्याला फुकट धान्य दिले जाते. प्रतिव्यक्ती पाच किलो गहू किंवा तांदुळ किंवा अंत्योदय योजनेखाली कुटुंबाला ३५ किलो प्रतिमहिना फुकट धान्य देण्याची ही योजना आहे. कोरोनाच्या काळात ती सुरू करण्यात आली. पण नंतर २०२४ च्या निवडणुका डोळ्यापुढे ठेवून पुन्हा तिला पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. मात्र या योजनेमध्ये तब्बल १३ टक्के अपात्र लोकांना धान्य दिले जात असल्याचे एका सर्वेक्षणात आढळले आहे. हे सर्वेक्षण केंद्र सरकारनेच करवून घेतले होते. म्हणजे यात विरोधकांचे काही कारस्थान किंवा कोण्या देशद्रोह्यांचा कट आहे असा कांगावा भाजपला करता येणार नाही. २०२५-२६ मध्ये करण्यात आलेल्या या सर्वेक्षणातील एकूणच आकडेवारी भयंकर धक्कादायक आहे. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमध्ये सुमारे ३९ टक्के लोक अपात्र असूनही या योजनेचा फायदा घेत आहेत. या मंडळींकडे स्वतःचे तीन-चार खोल्यांचे घर आहे, काही जणांकडे एअर कंडिशनिंग आहे व अन्य काही जणांकडे मोटारी आहेत असे आढळले आहे.

२२ हजार कोटींचा घोटाळा?

महाराष्ट्रात या योजनेच्या लाभार्थींची एकूण संख्या ६.५४ कोटी आहे. त्यातील तब्बल वीस टक्के लोक अपात्र असावेत असा सर्वेक्षणाचा अंदाज आहे. या सर्वेक्षणासाठी प्रत्येक राज्यातून काही शे लाभार्थी निवडण्यात आले. देशभरातून एकूण ५१ हजार लोकांचा अभ्यास करण्यात आला. कोणत्याही सर्वेक्षणात काही लोकांचे सॅम्पल घेतले जाते व त्या आधारे एकूण योजनेबाबत निष्कर्ष काढले जात असतात. त्यानुसार व केंद्राच्या देखरेखीखालीच हे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या योजनेनुसार ग्रामीण भागातील ७५ टक्के आणि शहरी भागातील सुमारे ६५ टक्के कुटुंबांना फुकट धान्यवाटप केले जाते. एकूण लाभार्थ्यांच्या प्रस्तावित संख्या ८१ कोटी आहे. पण ऑक्टोबर २०२६ अखेर योजनेत प्रत्यक्ष लाभार्थी ७८ कोटी ६३ लाख आहेत. ७८ कोटींपैकी अगदी दहा टक्के लोक हे बनावट किंवा अपात्र लाभार्थी आहेत असे गृहित धरले तरी ती संख्या सुमारे आठ कोटी होते. या आठ कोटी लोकांना दर महिन्याला एका अर्थाने बेकायदेशीररीत्या फुकट धान्यपुरवठा चालू आहे. या अपात्रांमध्ये शहरी भागातील लाभार्थींचे प्रमाण अधिक आहे. आणि हे सर्व सरकारच्या डोळ्यादेखत चालू आहे किंवा सरकार मुद्दामच हे सगळे घडवून आणत आहे. या योजनेसाठीचे एकूण अनुदान ४.६९ लाख कोटी आहे. त्यातील २.२८ लाख कोटी रुपये केंद्र सरकारचे आहेत. म्हणजेच दहा टक्के अपात्रांच्या हिशेबाने वर्षाला तब्बल २२ हजार कोटी रुपयांचा दरोडा घातला जात आहे व सरकार तो घालू देत आहे. दुसऱ्या भाषेत भाजपवाले निवडणुका जिंकण्यासाठी हे सरकारातून २२ हजार कोटी रुपये खर्च करीत आहेत व मते मात्र आपण मिळवत आहेत. अर्थात यामध्ये केंद्र सरकारला एक पळवाट आहे. ही योजना केंद्राची असली तरी त्यातील लाभार्थी कोण असावेत याचे निकष राज्य सरकारे जारी करीत असतात. राज्याराज्यांनुसार त्यात फरक आहे. शिवाय योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणीही राज्येच करतात. यामुळे केंद्र सरकार कदाचित याच चुकांची उर्फ चोऱ्यांची जबाबदारी राज्यांवर ढकलून मोकळे होऊ शकेल.

आधारही निरर्थक?

पण त्याला तसे करता येणार नाही. कारण ही योजना गेली सात वर्षे चालू आहे. तिच्यातील गफलती एव्हाना लक्षात येणे आवश्यक होते. त्यांच्याकडे डोळेझाक करून आंधळे दळते कुत्रे पीठ खाते या म्हणीप्रमाणे चालू राहते हे पटणारे नाही. या योजनेवर यापूर्वी वारंवार टीकाही झालेली आहे. एकीकडे भारत ही जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे असा प्रचार करायचा आणि दुसरीकडे देशातील ८० कोटी लोकांना फुकट धान्य द्यायचे हा कमालीचा विरोधाभास आहे हे अनेकांनी दाखवून दिले आहे. पण मोदींना आपण श्रीमंत म्हणून मिरवायचे आहे आणि गरिबांना मदतीचा हात दिल्याचे दाखवून मतेही मिळवायची आहेत. आपल्या सरकारच्या काळात देशातील ५० कोटी लोक गरिबीतून बाहेर आले असे मोदी सध्या सर्वत्र सांगतात. हे जर गरिबीतून बाहेर आले तर अजूनही त्यांना फुकट धान्य आणि लाडक्या बहिणींना दरम हा पैसे का द्यावे लागतात याचे उत्तर मोदींनी द्यायला हवे. हे असे होते याचे कारण आपल्याकडची भीषण विषमता आणि कमालीची महागाई. आज स्थिती अशी आहे की, बहुसंख्य लोकांकडे स्थायी रोजगार नाही. निव्वळ शेतीवर पोट भरणे अशक्य आहे. त्यामुळे किडुकमिडुक रोजगार किंवा शेतीत मजुरी करून कोट्यवधी लोक जगतात. त्यांना ही असली सरकारी फुकटची कृपा ही आधार वाटते. पण त्यातून त्यांचे भले होत नाही. पाय मोडलेल्याला काठीचा आधार असावा त्याप्रमाणे ही मदत असते. काठी काढून घेतली की पाय मोडलेला चालू शकत नाही. कल्याणकारी योजना अगदी अमेरिकेतही असतात. तेथेही गरिबांचे, रस्त्यावर राहणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. त्यांच्यासाठी अन्नाची कुपन्स दिली जातात. रोख रक्कम दिली जाते. गरीब कुटुंबातील मुलांना शाळांमध्ये माध्यान्हीचे भोजन दिले जाते. पण त्यावर देखरेख असते. त्यात लबाडी होत नाही. आपल्याकडे रेशनवरचे धान्य घेऊन खुल्या बाजारात विकणे हा एक धंदा आहे. अपात्र लोकांची छाननी नीट होत नसल्याने हा धंदा चालू राहतो. आधार, बोटांचे ठसे, डोळ्यांचे ठसे यांचा गाजावाजा चालू असतो. लोकांच्या खात्यात थेट पैसे जमा केल्याने मध्यस्थांचा कणा कसा मोडला म्हणून सरकार स्वतःची पाठ थोपटून घेत असते. पण ही यंत्रणा कशी निरर्थक ठरवता येते याचे हे जितेजागते उदाहरण आहे. याच रीतीने शेतकऱ्यांसाठी दिले जाणारे पैसे, मुद्रा योजनेखालची कर्जे यामध्येही दरोडे पडत असावेत असे कोणाला वाटले तर त्यात त्यांना दोष देता येणार नाही. सरकार यावर काय कारवाई करते यावरून आता त्याची नियत कळून येईल.

विचार

गुंतवणूक, मालमत्ताविक्री आणि नवे आव्हान

सरत्या आठवड्यातील काही आर्थिक भाकिते नोंद घेण्याजोगी ठरली आहेत. अलिकडेच समोर आलेली अशी पहिली बातमी म्हणजे स्वच्छ ऊर्जाक्षेत्रात सरकार ४०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. दुसरी बातमी म्हणजे सरकारी कंपन्यांच्या मालमत्तांच्या विक्रीतून १५ हजार कोटी रुपये उभे राहणार आहेत. दरम्यान, जलसंकटामुळे भारताच्या आर्थिक विकासासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता समोर आली आहे.

महेश देशपांडे

दिवाळीच्या वातावरणात अर्थकारणाला बरकत असली तरी धमाकेदार आर्थिक फटाके फुटले नाहीत. त्यातल्या त्यात काही आर्थिक भाकिते मात्र नोंद घेण्याजोगी ठरली. अलिकडेच समोर आलेली अशी पहिली बातमी म्हणजे स्वच्छ ऊर्जाक्षेत्रात सरकार ४०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. दुसरी बातमी म्हणजे सरकारी कंपन्यांच्या मालमत्तांच्या विक्रीतून १५ हजार कोटी रुपये उभे राहणार आहेत. दरम्यान, जलसंकटामुळे भारताच्या आर्थिक विकासासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता समोर आली आहे.

भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्षेत्रावरील गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत असल्याचे संकेत मिळत असून सरकारला नवीकरणीय ऊर्जाक्षेत्रातील कंपन्यांकडून सुमारे ४०० अब्ज डॉलरच्या दीर्घकालीन गुंतवणुकीची बांधिलकी मिळाली आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी 'भारत रिन्यूएबल एनर्जी समिट अँड एक्स्पो २०२६'मध्ये ही माहिती दिली. ते म्हणाले, 'सीईओ राउंडटेबलमध्ये आम्हाला या क्षेत्रात ४०० अब्ज डॉलरच्या दीर्घकालीन गुंतवणुकीची बांधिलकी मिळाली आहे; मात्र मी कोणत्याही विशिष्ट आकड्यावर भर देऊ इच्छित नाही. भू-राजकीय अस्थिरता असूनही गेल्या दोन वर्षांमध्ये नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात देशांतर्गत आणि परदेशी गुंतवणूक मिळून सहा ते सात लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. २०३० च्या अखेरपर्यंत या क्षेत्रात अतिरिक्त २१ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक असेल. ही गुंतवणूक निश्चितपणे येईल, असा मला विश्वास आहे. २०३० पर्यंत ५०० गीगावॉट स्थापित क्षमता गाठण्यासाठी ही गुंतवणूक पुरेशी ठरेल. यामध्ये नवीकरणीय ऊर्जा, वीज पारेषण, ऊर्जा साठवणूक आणि उत्पादन प्रकल्पांमधील गुंतवणुकीचा समावेश असेल.'

आर्थिक वर्ष २०२७ ते आर्थिक वर्ष २०३१ या कालावधीमध्ये ग्रिडस्तरावर ९२ गीगावॉट-तास ऊर्जा साठवणूक क्षमता विकसित करण्यासाठी १४,५०० कोटी रुपयांच्या व्यवहार्यता अंतर वित्तपुरवठा (व्हायबिलिटी गॅप फंडिंग) योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. याबाबत श्री. जोशी म्हणाले, की या योजनेचा नवीकरणीय ऊर्जाक्षेत्राला मोठा फायदा होईल. या अंतर्गत पंपयुक्त जलविद्युत प्रकल्प आणि बॅटरी ऊर्जा साठवणूक प्रणालींचा विस्तार करण्यात येईल. सध्या देशातील सौर सेल उत्पादन क्षमता ४७ गीगावॅट आहे. ती या वर्षी डिसेंबरपर्यंत वाढून ७० गीगावॅट तर पुढील वर्षी मे-जूनपर्यंत शंभर गीगावॅट होईल. सौर ऊर्जेच्या संपूर्ण मूल्यसाखळीत सुरुवातीच्या टप्प्यातील घटकांचे उत्पादन वाढवण्यासाठी सरकार प्रोत्साहन देण्याचे मार्गही शोधत आहे. सौर सेल निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या इंगट आणि वेफरची उत्पादन क्षमता सध्या वाढून नऊ गीगावॉट झाली आहे.

दरम्यान, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या सरकारी कंपन्यांच्या वापरात नसलेल्या जमिनी आणि इमारतींची विक्री करून केंद्र सरकार मोठा महसूल उभारण्याच्या तयारीत आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये या मालमत्तांच्या विक्रीतून १५ हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम उभारण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. या योजनेत दूरसंचार कंपन्या 'एमटीएनएल' आणि 'बीएसएनएल'सह 'राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड' (आरआयएनएल), 'इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज' (आयटीआय) आणि 'हिंदुस्तान इन्सेक्टिसाइड्स लिमिटेड'(एचआयएल) यांसारख्या सरकारी कंपन्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, केवळ 'एमटीएनएल'च्या मालमत्तांच्या विक्रीतून पुढील दोन वर्षांमध्ये चार ते पाच हजार कोटी रुपये उभारण्याची योजना आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, केंद्र सरकार आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये सरकारी कंपन्यांच्या वापरात नसलेल्या जमिनी आणि इमारतींची विक्री करून १५ हजार कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळवू इच्छित आहे. या कामाची जबाबदारी 'नॅशनल लँड मॉनेटायझेशन कॉर्पोरेशन' (एनएलएमसी) या संस्थेकडे सोपवण्यात आली आहे. ही संस्था केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेली सरकारी कंपनी आहे.

केंद्र सरकार आणि सरकारी कंपन्यांच्या मुख्य व्यवसायासाठी आवश्यक नसलेल्या जमिनी आणि इमारतींचे व्यावसायिक मूल्य विकसित करून त्यातून महसूल मिळवणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या संपूर्ण योजनेत 'एमटीएनएल'च्या जमिनी आणि इतर मालमत्तांना विशेष महत्त्व आहे. सरकार पुढील दोन वर्षांमध्ये 'एमटीएनएल'च्या मालमत्ता विक्रीतून चार हजार ते पाच हजार कोटी रुपये उभारण्याची योजना आखत आहे. 'एमटीएनएल'वर सध्या सुमारे दहा हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यामुळे मालमत्ता विक्रीतून मिळणाऱ्या रकमेमुळे कंपनीवरील कर्जाचा भार कमी करण्यास आणि आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते. 'एमटीएनएल'व्यतिरिक्त 'बीएसएनएल', 'राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड' (आरआयएनएल), 'इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज' (आयटीआय) आणि 'हिंदुस्तान इन्सेक्टिसाइड्स लिमिटेड' (एचआयएल) या संस्थांच्या जमिनी आणि इमारतींचाही या योजनेत समावेश आहे. या कंपन्यांकडे अशा अनेक मालमत्ता आहेत, ज्यांची त्यांच्या मुख्य व्यवसायासाठी सध्या आवश्यकता नाही. या मालमत्तांचा योग्य वापर करून महसूल उभारण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या योजनेमुळे सरकारी कंपन्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होण्याबरोबरच केंद्र सरकारला अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे.

भारत ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे; मात्र या आर्थिक प्रगतीच्या मार्गात पाण्याची टंचाई हे सर्वात मोठे आव्हान बनले आहे. एका बाजूला पाणीटंचाईमुळे रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीवर परिणाम होत असल्याने सर्वसामान्यांच्या ताटातील अन्न महागण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुसरीकडे, औष्णिक वीज प्रकल्पांपासून अत्याधुनिक औद्योगिक क्लस्टर्सपर्यंत अनेक क्षेत्रांना अस्तित्व टिकवण्यासाठी जलव्यवस्थापन आणि सांडपाण्याच्या पुनर्वापरासारख्या मूलभूत उपाययोजनांवर अवलंबून राहावे लागत आहे. भारताच्या वेगवान आर्थिक विकासाने जगाचे लक्ष वेधले आहे. याच विकासाच्या बळावर 'विकसित भारत २०४७' हे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार करण्यात आला आहे; मात्र या ध्येयासमोर जलसंकट गंभीर अडथळा म्हणून उभे राहिले आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या (डबल्यूईएफ) माहितीनुसार, जगातील १८ टक्के लोकसंख्या भारतात राहते; मात्र जगातील गोड्या पाण्याच्या संसाधनांपैकी भारताच्या वाट्याला केवळ चार टक्के पाणी येते. या जलसंकटाचा थेट परिणाम कृषी क्षेत्रावर होत आहे. कमी पावसामुळे शेतांमध्ये जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. महाराष्ट्रातील जालनासारख्या जिल्ह्यांमध्ये सरासरी ४८ टक्के कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना गहू आणि हरभरा यांसारख्या रब्बी पिकांची पेरणी करता येत नाही. कृषी उत्पादनात संभाव्य घट होण्याच्या पार्श्वभूमीवर महागाई आणखी वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. साखर, डाळी, तांदूळ आणि भाजीपाल्याच्या किम तींमध्ये वाढ सुरूच आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर मोठा दबाव निर्माण झाला

आता एक महत्वाची बातमी. जलसंकट आता केवळ सामाजिक किंवा नागरी समस्या राहिलेली नाही. ते भारताच्या औद्योगिक आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाकांक्षांसाठी मोठा 'गुंतवणूक धोका' बनले आहे. पोलाद, रसायने आणि वस्त्रोद्योग यांसारख्या पारंपरिक उद्योगांपासून भारताच्या नव्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपर्यंत अनेक क्षेत्रे पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. यात सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्प, औषधनिर्मिती उद्योग आणि डेटा सेंटर्स यांचाही समावेश आहे. 'नीती' आयोगाच्या आकडेवारीनुसार, २०३० पर्यंत पाण्याची मागणी पुरवठ्याच्या दुप्पट होऊ शकते. यामुळे सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) सहा टक्क्यांपर्यंत नुकसान होण्याचा अंदाज आहे. पाणीटंचाईमुळे यापूर्वीही औष्णिक वीज प्रकल्प बंद पडले आहेत. पाण्याची उपलब्धता संकटग्रस्त राहिल्यास अनेक क्षेत्रांमध्ये नव्या कारखान्यांचे संचालन आणि विस्तार पूर्णपणे ठप्प होऊ शकतो.

या दुहेरी संकटावर मात करण्यासाठी केवळ नव्या जलस्रोतांचा शोध घेणे पुरेसे ठरणार नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. त्याऐवजी प्रभावी जलव्यवस्थापन, पाण्याचे तर्कसंगत दर आणि सांडपाण्याचा मोठ्या प्रमाणावर पुनर्वापर यांचा अवलंब करणे आवश्यक आहे. भारताच्या शहरांमधून दररोज सुमारे ७२.३६ कोटी लिटर सांडपाणी निर्माण होते; मात्र, त्यापैकी केवळ २०.२३ कोटी लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्रक्रिया केलेले सांडपाणी औष्णिक वीज प्रकल्प, डेटा सेंटर्स आणि औद्योगिक क्लस्टर्सना वापरासाठी आवश्यक प्रमाणात व सहज उपलब्ध करून दिल्यास उद्योग आणि सामान्य नागरिकांमध्ये गोड्या पाण्यासाठीची स्पर्धा कमी होऊ शकते.

चर्चा आजची

योजना पूर्ण, मात्र विद्यूत जोडणीचा अभाव



जलजीवन मिशन अंतर्गत सहा तालुक्यातील २५ योजनांची कामे पुर्ण झाली. मात्र घरात पाणी पोहचविण्यासाठी लागणारी विद्यूत सेवा अद्याप सुरु झाली नाही. जिल्हा प्रशासनाकडून त्यासाठी लागणारा निधीच उपलब्ध झाला नाही. त्यामुळे योजना पुर्ण, मात्र विद्यूत जोडणीचा अभाव अशी परिस्थितीत निर्माण झाली आहे. शासनाकडून सुमारे तीन कोटी रुपयांची प्रतिक्षा या कामांसाठी लागली आहे. याकडे प्रशासन कधी लक्ष देईल असा सवाल जनमानसातून विचारला जात आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जलजीवन योजनांचा सावळा गोंधळ वेगवेगळ्या बैठकातून जगजाहीर झाला आहे. नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊनही विद्यूत जोडणीच्या कामांसाठी मात्र जिल्हा प्रशासनाकडून निधीच उपलब्ध झाल्याची माहिती समोर आली आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत २५ नळ पाणी पुरवठा योजनांसाठी विद्यूत जोडणी निधी अभावी रखडली आहे. प्रशासनाकडून तीन कोटी सात लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला नसल्याने विद्यूत जोडणीचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे नळ असूनही पाणी नसल्याचे चित्र सहा तालुक्यांमध्ये निर्माण झाले आहे.

प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या. वाढते पर्यटन, औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागात पाण्याचा दुष्काळ कायमच असतो.जानेवारीनंतर पाणी कपातीचे संकट सुरु होते. ग्रामीण भागातील पाणी संकट दूर करण्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांना शुध्द पाणी देण्यासाठी केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत गावे, वाड्यांमध्ये नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या. रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायत हद्दीतील पाच हजार तीन गावे व वाड्यांमधील १६ लाख ६४ हजार नागरिकांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबण्याची अशा होती. परंतू या योजनेचा आराखडाच योग्य केल्या नसल्याने ही योजना पुर्णतः रखडल्याची माहिती पालकमंत्र्यांपासून महिला व बालविकास मंत्री यांनी वेळोवेळी बैठकीतून दिली. त्यामुळे आजही हजारो कुटुंबिय पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

जिल्ह्यातील रोहा, महाड, पोलादपूर, मुरूड, म्हसळा, माणगांव या सहा तालुक्यातील २५ योजनांची कामे पुर्ण झाली आहेत. त्यामध्ये रोहामधील चार, म्हसळामधील तीन, पोलादपूरमधील सहा, महाडमधील चार, माणगांवमधील पाच व मुरूडमधील तीन योजनांचा समावेश आहे. नळ सुरू करण्यासाठी तसेच विजेद्वारे घरात पाणी पोहचविण्यासाठी महावितरण कंपनीकडून रोहीत्र, विद्यूत तार, खांब बसविण्यासाठी तीन कोटी सात लाख ६३ हजार ७९१ रुपयांच्या निधीची गरज आहे. हा निधी मिळावा, म्हणून जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून जिल्हा प्रशासनाकडे निधीची मागणी केली आहे. जिल्हा नियोजन पासून आपत्ती व्यवस्थापन विभागाला पत्र देऊन निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र जिल्हा प्रशासनाकडून निधीच उपलब्ध झाला नाही. त्यामुळे अनेक महिन्यांपासून नळ असूनही पाणी नाही, अशी परिस्थिती या गावांतील हजारो नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या उदासीनतेचा फटका ग्रामीण भागातील नागरिकांना बसू लागला आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांची २५ कामे पुर्ण झाली आहेत. विद्यूत जोडणीतून पाणी घरापर्यंत पोहचविण्यासाठी निधीची गरज आहे. जिल्हा प्रशासनासह आपत्ती व्यवस्थापन विभागाला निधीची उपलब्धता करण्याची मागणी केली आहे. पालकमंत्री. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजनमधून निधी उपलब्ध करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यामुळे हा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने वर्तविली आहे. जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील न्हावे सोनखार,चिंचवली तर्फे आतोने, चिंचवली तर्फे दिवाळी,कडसूरे. म्हसळामधील पानवे, वाघाव. पोलादपूरमधील आडवलवे खुर्द, महार्गूल मोरवाडी,शेत्रफळ, मोरसडे, पळचील, फनसकोंड.महाडमधील वीर, विन्हेरे, घेराकिल्ला, पाचाड. माणगावमधील बामनगांव, निजामपूर, चिंचवली, तळेगांव तर्फे गोरेगाव, पन्हळघर खुर्द. मुरूडमधील आरावघर,चोरढे, तेलवडे या गावांमध्ये योजना राबविण्यात आल्या आहेत. या गावांमधील योजना पूर्ण झाल्या आहेत. परंतू योजना परिपुर्ण होण्यासाठी विद्यूतीकरण गरजेचे आहे. विद्यूत जोडणी केल्याशिवाय ही योजना पुर्ण होऊ शकत नाही. प्रशासनाने जिल्हा नियोजनमधून निधीची तरतूद करण्याची ग्वाही बैठकीतून दिली आहे. त्यामुळे त्यांची अंमलबजावणी कधी पूर्ण होणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

लोकसंसद

'मेटा'चे एक पाऊल पुढे

सध्याच्या मोबाईलच्या जमान्यात मोबाईलशिवाय आपले पानही हालत नाही. त्यातही सोशल मीडियाने आपल्याला चांगलाच विळखा घातलेला आहे. हा विळखा इतका घट्ट का झाला आहे की त्यामुळे आपल्या अमूल्य वेळेचा अपव्यय होतोच आहे परंतु त्याचवेळी मानसिक तणावाला कारणीभूत ठरणारी आपली मानसिक ऊर्जाही मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. आपण काहीतरी महत्त्वाचे काम करण्यासाठी (उदा.एखादे बिल भरण्यासाठी) फोन उचलतो आणि नकळत इन्स्टाग्राम, फेसबुक किंवा यूट्यूबच्या जाळ्यात अडकत जातो. पुढचे काम मग अल्गोरिदम करत राहतो. आपण भानावर येतो तोपर्यंत अर्धा-एक तास सहज निघून गेलेला असतो. अल्गोरिदम काम म्हणजे सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या आवडी-निवडीचा आणि वर्तनाचा अभ्यास करून त्यांना त्याप्रमाणे पोस्ट दाखवायच्या. अशावेळी अत्यंत आक्षेपार्ह आणि हिंसक मजकुराचा (पोस्टचा) किशोरवयीन मुलांच्या मनावर सर्वाधिक दुष्परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर भारतातील इंस्टाग्राम वापरकर्त्यांना अश्लील आणि हिंसक पोस्ट दिसू नयेत, यासाठी मेटा कंपनीने प्रगत एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सिस्टीममध्ये नुकतेच मोठे बदल केले आहेत. म्हणजेच यापुढे युजर्स ज्या अकाउंट्सना फॉलो करत नाहीत, पण तरीसुद्धा इंस्टाग्राम त्यांना स्वतःहून आक्षेपार्ह 'रील्स' सुचवत होते, त्या दिसणे आता बंद होईल किंवा खूप कमी होईल. यामुळे अनावश्यक अल्गोरिदमला आळा बसेल.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

शीख धर्माचे संस्थापक गुरु - गुरु नानकदेव

गुरु नानक गुरपरब किंवा गुरु नानक जयंती हा दिवस शीख गुरु एवं सिंधी गुरु म्हणून गुरू नानकदेव यांचा वाढदिवस साजरा करणारा सण आहे.मित्रहो,आजच्या दिनी ❋गुरु नानकदेव यांची ५५७ वी जयंती❋ साजरी होताहे.बंधू भगिनींनो,सर्वप्रथम आपण गुरु नानकदेव यांच्या पारिवारिक सदस्यांचा परिचय करून घेऊया.गुरु नानक यांच्या वडिलांचे नाव लाला कल्याण राय (मेहता कालू) तर, आईचे नाव माता त्रिप्ता (तृप्ता).त्यांच्या पत्नीचे नाव सुलक्खनी देवी(माता सुलखनी). अपत्ये श्रीचंद आणि लखमी दास. याबद्दल समस्त शीख व सिंधी समुदायातील सदस्यांना गुरु नानकदेव यांच्या जयंती दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा! गुरु नानकदेव हे दहा शीख गुरूंमधील पहिले शिखांचे गुरु होत. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे शीख अन् सिंधी या दोन्ही समुदायांसाठी ❋गुरु नानक जयंती❋ हा एक पवित्र सण मानला जातो.या दिवसाला ❋प्रकाश सण❋ असेही संबोधिले जाते.या दिनी सर्वत्र दिवे लावले जातात. विशेषत: कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी गुरु नानकदेव यांचा जन्मोत्सव साजरा केला जातो.आजच्या दिवसाला गुरु पर्व अन् प्रकाश पर्व असेही मानले जाते. गुरु नानकदेव यांचा जन्म आजच्या पाकिस्तानम धील पंजाब प्रांत,लाहोर जवळील तलवंडी येथे १५ एप्रिल १४६९ रोजी झाला. अन् जणू शीख व सिंधी समुदायाचा मानबिंदू उदयास आला.या तलवंडी गावाला आता ननकाना साहिब असे म्हटले जाते. गुरु नानकदेव हे शीख धर्माचे संस्थापक असून,ते पहिले गुरु मानले जातात. गुरु नानकदेव यांचा जयंती दिन देशात सर्वत्र हर्षोल्हसात साजरा व्हावा, यासाठी केंद्र व राज्य सरकारांकडून सार्वजनिक सुट्टी जाहीर केली जाते. जात, धर्म, लिंग, श्रीमंत -गरीब या आधारांवर कोणताही भेदभाव न करता, स्त्री-पुरुष समान आहेत,असे त्यांच्या सामाजिक समतेचे स्वरूप होते.गुरु नानकदेव यांनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. प्रामाणिक आचरण ठेवून निःस्वार्थ सेवेत गुंतून रहावे, हा उपदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला. गुरु नानकदेव यांनी अंधश्रद्धेला कडाडून विरोध करत मूर्तिपूजा, शुद्ध आचरण व अंत:करणपूर्वक भक्तीला महत्व दिलं. पुढे जाऊन ते आपल्या उपदेशात म्हणतात,''काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर या विकारांवर विजय मिळविणे,हेच खरे मानवाचे पवित्र जीवन आहे. ईश्वर एकच आहे, असा उपदेश देणारे गुरु नानकदेव हे सर्वधर्मसम भाव, मानवसेवा व स्त्री -पुरुष समानतेवर विश्वास ठेवणारे थोर संत होत. कर्मकाडांना विरोध करून प्रेम, दया व सत्याचा मार्ग अवलंबा, असा संदेश त्यांनी मानवजातीला दिला. गुरु नानकदेव यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जयंती दिनी लंगर म्हणजेच भेदभाव विसरून सर्वांना एकत्र बसवून मोफत भोजन देण्याची प्रथा-परंपरा सर्वत्र पाळली जाते. गुरु नानकदेव यांनी समाजात समता, बंधुभाव,सौहार्द, चांगुलपणा या सद्गुणांवर आधारित अनोखे आध्यात्मिक व सामाजिक व्यासपीठ उभे केले.शीख समुदायाच्या पवित्र ❋गुरुग्रंथ साहिब❋ ग्रंथात काव्यात्मिक शैलीतील सुमारे ९७४ श्लोक अंतर्भूत आहेत.रयतेला सत्याचा अन् ईश्वराचा मार्ग दाखविणाऱ्या थोर गुरु नानकदेव यांचे २२ सप्टेंबर १५३९ रोजी पाकिस्तानच्या करतारपूर येथे दुःखद निधन झाले. तेथेच करतारपूर साहिब ही त्यांची समाधी स्थित आहे. बंधू भगिनींनो, समाजाचे आपल्यावर अनेक उपकार असतात. त्यातून ऋणाईत होण्यासाठी आपल्या कमाईतला काही हिस्सा प्रत्येकाने गोरगरीब, गरजूंना मदत म्हणून दान करावा. जीवनात आपल्या हातून कोणाचेही शोषण वा फसवणूक होणार नाही, याची खबरदारी घेऊन प्रामाणिकपणे जीवन जगावे. याशिवाय मनुष्

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ नोव्हेंबर

१) श्री.यशवंत काशिनाथ पाटील
मु.परहूर, अलिबाग,
२४-११-१९३१

२)श्री.जगदीश रामचंद्र नागे
मु.वरसोली, अलिबाग
दि.२४-११-१९५७

३)श्री.उदय चिंतामण जोशी
अलिबाग दि.२४-११-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

कचरा उचलण्यासाठी पैसे द्यावे लागणार

ठाणे : भिवंडी शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ यांचा कचरा मोठ्या प्रमाणावर जमा होतो. आतापर्यंत घंटागाडी हा कचरा घेऊन जायची. मात्र यापुढे कचरा उचलण्यासाठी पैसे द्यावे लागणार आहेत. कॅटरिंग, रुग्णालय, शाळा, दुकाने, मॉल, सुपरमार्केट यांचा कचरा गोळा करण्यासाठी २३ प्रभागांमध्ये स्वतंत्र ठेकेदार नेमण्याचा निर्णय भिवंडी महापालिकेने घेतला आहे. बऱ्याच वेळा हॉटेल, खानावळ, मंगल कार्यालयातील कचरा रस्त्याकडेला फेकला जातो. त्यामुळे अस्वच्छता पसरत असल्याने सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न उपस्थित होत असल्याच्या तक्रारी वाढल्याने पालिका प्रशासनाने उपलब्ध यंत्रणेव्यतिरिक्त व्यावसायिक आस्थापनांमध्ये जमा होणारा कचरा संकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे.

सुशिला शिंदे यांचे निधन

कोलाड : सुधागड तालुक्यातील पाली (भोई आळी) येथील सुशिला रघुनाथ शिंदे यांचे सोमवारी (दि.१६) निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे व मोठा शिंदे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि.२५ नोव्हेंबर रोजी उद्धर येथे, तर उत्तरकार्य विधी शनिवार दि.२८ नोव्हेंबर रोजी त्यांच्या राहत्या निवास्थानी होणार आहेत.



उरण तालुक्यात थंडीची चाहूल

उरण : तालुक्यात हळूहळू गुलाबी थंडीची चाहूल जाणवू लागली आहे. पहाटेच्या वेळी हवेत गारवा निर्माण होत असून ग्रामीण भागातील शेतशिवार, मोकळी मैदाने, डोंगरांच्या पायथ्याशी आणि अंतर्गत रस्त्यांवर धुक्याची चादर पसरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सकाळच्या आल्हाददायक वातावरणामुळे मॉर्निंग वॉक करणारे, व्यायामप्रेमी आणि ज्येष्ठ नागरिकांना थंडीचा सुखद अनुभव मिळत आहे. मात्र, पहाटे थंडीचा गारवा आणि दुपारी उन्हाचा तडाखा अशा बदलत्या वातावरणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. हवामानातील चढ-उतार आणि धूळप्रदूषणामुळे संवेदनशील नागरिकांना अधिक त्रास होऊ शकतो.

कोडद्वारे मिळणार ऐतिहासिक माहिती

जंजिरा किल्ल्यावर डिजिटल ऑडिओ गाईड सुविधेचा शुभारंभ

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

जागतिक वारसा सप्ताह २०२६चे औचित्य साधून भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मुंबई मंडळातर्फे मुरूड-राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर डिजिटल ऑडिओ गाईड सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संवर्धक बजरंग येलीकर आणि पोलीस उपनिरीक्षक बळीराम केंद्र यांच्या हस्ते या सुविधेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मुंबई मंडळाचे सहाय्यक पुरातत्त्वज्ञ रविराज, सहाय्यक संवर्धक बजरंग येलीकर, पोलीस उपनिरीक्षक बळीराम केंद्र, अधीक्षक पुरातत्त्वज्ञ डॉ. अभिजित आंबेकर, बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि पुरातत्त्व



विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

वारसास्थळांचा इतिहास, सांस्कृतिक महत्त्व आणि ऐतिहासिक ठेवा पर्यटकांपर्यंत अधिक सोप्या व रंजक पद्धतीने पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक वारसा सप्ताहादरम्यान मुंबई मंडळाच्या कार्यक्षेत्रातील १८ स्मारकांवर डिजिटल ऑडिओ गाईड सुविधा सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाची संकल्पना अधीक्षक पुरातत्त्वज्ञ डॉ. अभिजित आंबेकर यांनी मांडली आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारासह महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात आलेले कोड मोबाईलद्वारे स्कॅन केल्यानंतर पर्यटकांना किल्ल्याची ऐतिहासिक माहिती, नकाशे, छायाचित्रे तसेच दृक्-श्राव्य सामग्री पाहता आणि ऐकता येणार आहे.

विशेष म्हणजे, आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याने इंटरनेट जोडणीशिवायही पर्यटकांना माहिती उपलब्ध होणार आहे. या डिजिटल सुविधेमुळे जंजिरा किल्ल्याला भेट देणाऱ्या पर्यटकांना केवळ ऐतिहासिक वास्तू पाहण्यापुरता अनुभव मर्यादित न राहता, किल्ल्याचा समृद्ध इतिहास जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. वारसा स्थळांविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे आणि ऐतिहासिक वारशाशी पर्यटकांचे नाते अधिक दृढ करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

> **"अनेकदा स्मारकाला भेट देणाऱ्या पर्यटकांना तेथील ऐतिहासिक ठिकाणांचे महत्त्व आणि नेमके काय पाहावे, याची पुरेशी माहिती नसते. डिजिटल ऑडिओ गाईडमुळे ही उणीव दूर होण्यास मदत होणार आहे. संशोधनाधारित माहितीच्या माध्यमातून किल्ल्याची उभारणी, ऐतिहासिक घडामोडी, महत्त्वाच्या लढाया, राजवंशीय व प्रादेशिक इतिहासातील स्थान आणि काळानुसार बदलत गेलेले महत्त्व पर्यटकांना समजून घेता येणार आहे.**
>
> **– डॉ. अभिजित आंबेकर, पुरातत्त्वज्ञ अधीक्षक**

हवेतील वाढता गारवा हापूसच्या मोहोरासाठी अनुकूल

। माणगाव । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात जाणवू लागलेला बदल आणि सकाळ-सायंकाळी वाढणारा गारवा यामुळे हळूहळू हिवाळ्याची चाहूल लागली आहे. उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या बदलामुळे काहीसा दिलासा मिळत असतानाच आंबा आणि काजू बागायतदारांच्या आशाही पल्लवित झाल्या आहेत.

हापूस आंब्याच्या मोहोर प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले थंड व कोरडे हवामान निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागल्याने यंदाच्या हंगामाबाबत बागायतदारांमध्ये अपेक्षा वाढल्या आहेत. काजू पिकालाही अनुकूल



हवामानाची साथ मिळाल्यास उत्पादनाच्या दृष्टीने समाधानकारक स्थिती निर्माण होऊ शकते. थंडीची ही चाहूल बागायतदारासाठी केवळ ऋतुबदल नसून नव्या आर्थिक आशेची सुरुवात ठरत आहे. काजू उत्पादकांनाही यंदा समाधानकारक उत्पादनाची अपेक्षा आहे. मात्र आगामी काळात थंडी किती टिकते, तापमान किती स्थिर राहते आणि अवकाळी पावसापासून पिकांचे संरक्षण कितपत होते, यावर यंदाच्या आंबा-काजू हंगामाचे चित्र स्पष्ट होणार आहे. निसर्गाने योग्य वेळी साथ दिल्यास रायगड जिल्ह्यातील बागांमध्ये मोहोराचा बहर फुलण्याबरोबरच बागायतदारांच्या आर्थिक आशांनाही नवी पालवी फुटू शकते.



भाविकांसाठी पाणी, फळांचे वाटप

अलिबाग : तालुक्यातील प्रसिद्ध नागेश्वर, आवास आणि कणकेश्वर यात्रेनिमित्त दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. या यात्रेच्या काळात पायी प्रवास करणाऱ्या व तसेच बैल गाडीने प्रवास करणारे यात्रेकरू भाविकांचा थकवा दूर व्हावा आणि त्यांना थोडा दिलासा मिळावा, या उदात्त भावनेतून झिराड ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून पाणी व फळे वाटपाची सेवा अखंडपणे सुरू आहे. यात्रा म्हणजे केवळ श्रद्धेचा सोहळा नव्हे, तर माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याची संधीही आहे, याचा प्रत्यय झिराड ग्रामस्थांच्या या उपक्रमातून येतो. कोणताही गाजावाजा न करता, प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता भाविकांची सेवा करण्याची ही परंपरा खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे.

निवडक



जामगाव येथे मोफत नेत्र तपासणी

सुतारवाडी : जामगाव येथील सामाजिक कार्यकर्ते संदेश सदुकार कोदे यांनी आयोजित केलेल्या लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ लायन्स क्लब कोलाड, लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग यांच्या सहकार्याने रविवारी (दि.२२) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर व रक्तदाब तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात २५० जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. पैकी ८० जणांना मोफत चष्मे देण्यात आले. तर दहा रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी अलिबाग येथे नेण्यात येणार असल्याचे सांगितले.



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

कोलाड : कॅप्टन तेलंगे फाउंडेशनच्या वतीने घोसाळे केंद्र शाळेतील १२५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य किटचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने फाउंडेशनतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. कॅप्टन तेलंगे फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत रोहा तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील विविध गरजू जिल्हा परिषद शाळांमध्ये एकूण ५०० शैक्षणिक साहित्य किटचे वाटप करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणारा फाउंडेशनचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून मदतीचा हात देणाऱ्या कॅप्टन तेलंगे फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

पान १ वरून

भाजपने 'राजा'ला तुडवले!

एकमेकांविरोधात आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. आता जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेना वाद जगजाहीर असतानाच भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातील वाद चव्हाट्यावर आला आहे. पेणमधील भाजपच्या कार्यकर्त्यांना शिंदे गटात सामावून घेतल्याबद्दल भाजपचे जिल्हा चिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी शिंदे गट शिवसेनेच्या कारभाराबाबत तीव्र निषेध सोशल मीडियाद्वारे व्यक्त केला. त्यानंतर आगामी काळात अलिबाग विधानसभा आमदारकीचे स्वप्न आजपासून विसरून जा, असा त्यांनी इशारा दिला. या प्रकारामुळे शिवसेना शिंदे गटाच्या अनेक कार्यकर्त्यांनी मोहिते यांचा निषेध व्यक्त करीत त्यांच्या प्रतिमेवर चपलांचा मारा केला. दरम्यान, एका सभेत राजा केणी यांनी मोहिते यांना परप्रांतिय बोलले. त्यामुळे भाजप आणि शिवसेना यांचा वाद पेटला असून, भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राजा केणी यांच्या विरोधात निषेध मोर्चा काढला. यावेळी राजा केणी यांना 'परप्रांतियाचा अर्थ कळत नसणारा गाढव' अशी उपासात्मक टीका करीत त्यांचे चित्र काढलेले बॅनरला पायाने तुडवले. यावेळी भाजपचे संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, अशोक वागे, स्वप्नील गाडे, मानसी मोहिते, रोशन भगत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपकडून इशारा

भाजप आणि नेते मंडळी यांच्याविरोधात शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांकडून अशा प्रकारचे वक्तव्य आणि टीका केली, बहारदर कार्यकर्ता रस्त्यावर येऊन त्यांना सडेतोड उत्तर दिले जाईल. आजच्या मोर्चा ही तर झाकी आहे, अजून बऱ्याचश गोष्टी बाकी आहेत, असा इशारा भाजप पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आला.

रेल्वेतून पडून तरुणाचा मृत्यू

घटनेची माहिती मिळताच महाडचे पोलीस निरीक्षक अभिजित नेवासे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. महाशक्ती ॲम्ब्युलन्सचे अनिल चव्हाण यांच्या मदतीने रेल्वे रुळ ओलांडून मृतदेह महाड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केल.

जि.प. कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

आकृतीबंधामध्ये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही विभागातील पदे कमी करण्यात येऊ नयेत. केंद्राप्रमाणे महागाई भत्त्याची थकबाकी तात्काळ देण्यात यावी. लेखा संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत व पदोन्नती परीक्षेबाबत तात्काळ निर्णय घेण्यात यावा. जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटी दूर करण्यात याव्यात. महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ मधील पदोन्नतीचा कोटा ३५ टक्के करण्यात यावा. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत तात्काळ निर्णय घेण्यात यावा. अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक म्हणून नेमण्यात आले आहे, ते रद्द करण्यात यावे. यासह इतर मागण्यांवर शासनाने त्वरित निर्णय घ्यावा. इत्यादी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या मागण्या कोणत्याही परिस्थितीत मान्य करून घेण्यासाठी ठोस आंदोलन करण्याची भूमिका या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक बलराज मगर, सुनील जानोरकर, विजयकुमार हळदे, रामचंद्र मडके,रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष, राजेंद्र गायकवाड, कार्याध्यक्ष पराग खोत, सचिव संतोष साळवकर देवेंद्र झेंडेकर, उपाध्यक्ष अंजली वर्तक, खजिनदार मेघा म्हात्रे आर्दीसह राज्यातील साधारपणे २५हून अधिक जिल्हा परिषदेतील कर्मचारी युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते.

शटडाऊननंतरही नशिबी गढूळ पाणी

व्यवस्थेतील कामांसाठी ३६ तासांचा शटडाऊन घेण्यात आला होता. या कालावधीनंतर नागरिकांना सुरळीत आणि स्वच्छ पाणी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, शटडाऊननंतरही नळातून येणाऱ्या पाण्याचा रंग तपकिरी असून, त्यामध्ये मातीचे मिश्रण असल्याचे नागरिकांनी दाखवून दिले आहे. या पाण्याला दुर्गंधीही येत असल्याने ते पिण्यासाठी वापरावे की नाही, असा गंभीर प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे. यापूर्वीही कळंबोली एलआयजी, सेक्टर ३ येथे पुरवठा होणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. बिसलेरीसारख्या नामांकित बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेबाबत चर्चा होत असताना, दुसरीकडे नागरिकांना मिळणारे पाणी नेमके किती सुरक्षित आहे, याची खात्री कोण देणार? असा सवाल उपस्थित होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून, सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, कळंबोली येथे पुरवठा होणाऱ्या पाण्याची नियमित तपासणी केली जाते का? पाण्यातील टीडीएस, क्लोरीनचे प्रमाण, जिवाणूंची उपस्थिती तसेच अन्य रासायनिक घटकांची तपासणी करण्यात आली आहे का, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

वृक्षतोडीविरोधात कर्जतकरांचा कँडल मार्च

पर्यावरणप्रेमी जाहीरपणे सांगत आहेत. परंतु, सरकार ते पटवून घेत नाही, अशा प्रकारे त्यांनी टीका केली. तसेच, हा प्रकल्प कर्जतला विनाशाकडे नेणारा असून, संपूर्ण देश कर्जतकरांच्या पाठीशी उभा आहे. त्यामुळे कर्जत तालुक्याला आणि सह्याद्री वाचवण्यासाठी आपल्याला अंतापर्यंत लढाई लढावी लागणार आहे, असेही मोरे यांनी सांगितले.

मोरबेच्या पाण्यावर विकासकाचा हक्क कशाला?

पाणीटंचाई लक्षात घेऊन म्हात्रे यांनी या बैठकीची मागणी केली होती. नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातून पनवेलकरांसाठी ३० एमएलडी पाणी मिळावे, ही त्यांची प्रमुख मागणी होती. नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नसताना विकासकाला दिलेली परवानगी कायम ठेवण्याची गरज काय, असा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

केवळ मोरबे धरणावर अवलंबून न राहता जांभिवली धरण, ओवे कॅम्प धरण, उसरण धरण आणि पोशीर जलप्रकल्प यांचाही पनवेलच्या पाणीपुरवठ्यासाठी वापर करता येऊ शकतो, असे म्हात्रे यांनी निदर्शनास आणले. या जलस्रोतांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असून, त्यासंबंधीची माहिती बैठकीत सादर केली. या सर्व प्रकल्पांबाबत मुख्यमंत्र्यांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन पनवेलकरांसाठी पाणी उपलब्ध करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन पालकमंत्री गोगावले यांनी दिले.

पनवेलची वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची गरज, नवीन पाणीपुरवठा योजना आणि सध्याच्या टंचाईवरील उपाययोजनांवरही बैठकीत चर्चा झाली. या बैठकीला खासदार श्रीरंग बारणे, आ. विक्रांत पाटील, महापौर नितीन पाटील, महापालिका आयुक्त मंगेश चितळे, नगरसेवक हरेश केणी, तुषार पाटील, रामदास शेवाळे, ॲड. प्रथमेश सोमण यांच्यासह जलसंपदा विभाग, सिडको, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आवासच्या यात्रेला भाविकांचा महासागर

यात्रेची रंगत वाढवली. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनीच यात्रेचा आनंद घेतला. त्याचबरोबर यात्रेतील एक महत्त्वाचे आकर्षण असणारे रात्री १० वाजल्यानंतर नागोबा मंदिरात खेळले जाणारे पारंपरिक गण हा धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

यात्रेदरम्यान ग्रामपंचायत आवासच्यावतीने भाविकांसाठी पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा आणि प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच, परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या यात्रेच्या नियोजनासाठी सरपंच अभिलाषा राणे, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केले. माजी सरपंच अभिजीत राणे आणि माजी पंचायत समिती सदस्य रणजित राणे यांनीही ग्रामपंचायतीच्यावतीने भाविकांचे स्वागत केले. यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि त्यांच्या पथकाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

वाढदिवसाचा आनंद निसर्गाच्या सेवेत

किनारपट्टीच्या पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, सभापती ॲड. अश्विनी ठोसर, मुख्याधिकारी सागर साळुंखे, नगरसेविका नीलम हजारे, निवेदिता वाघमारे, नगरसेवक समीर ठाकूर, ऋषिकेश माळी, सागर भगत, जमाल सय्यद, संजय कांबळे, नगरपरिषद वृक्ष प्राधिकरणाचे चेतन पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी सर्वांनी वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण रक्षणाचा संकल्प अधोरेखित केला.

वाढदिवसाच्या निमित्ताने झालेल्या या वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच सामाजिक सहभागातून शहराच्या हरित विकासाला चालना देण्याचा सकारात्मक प्रयत्न करण्यात आला. वाढदिवस साजरा करण्याची ही निसर्गाभिमुख संकल्पना अलिबागकरांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारी आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
पत्ता-कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा- ठाणे
ईमेल-eemsddkalwa@yahoo.co.in दुरध्वनी क्र ०२२-२५३७४७७०.

ई निविदा सूचना क्र. १९ सन २०२६-२०२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा B-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई- निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ : http://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

१.	कामाचे नांव	हेटवणे मध्यम प्रकल्प ता. पेण, जि. रायगड प्रकल्पाच्या सांडवा पुच्छ कालव्याच्या उर्जा अपव्यय (E.D.A) च्या भागास विद्युत रोषणाई व सुशोभीकरण करणे.
	जिल्हा	रायगड
	निविदेची किंमत रुपये	रु.३३,५१,०००/-
२.	कामाचे नांव	पाली भुतावली ता. कर्जत जि. रायगड येथील सेवाद्वार १.२ x १.२ मी-०१ नग व आपत्कालीन द्वार १.२ x १.२ मी-०१ नग, उच्चालक १२ मे.टन क्षमता दुरुस्ती, रंगकामे इतर अनुषंगिक यांत्रिकी कामे करणे.
	जिल्हा	रायगड
	निविदेची किंमत रुपये	रु.२५,०६,१७४/-

निविदा उपलब्ध कालावधी	दिनांक:३०/११/२०२६ ते दिनांक: ०७/१२/२०२६
निविदा उघडण्याचा दिनांक	दिनांक : ०९/१२/२०२६

जा.क्र.यांभाविवि/लेशा-२/२१६७/ सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा - ठाणे.
दिनांक-२०/११/२०२६

सही/-
(सं.ना.रोकडे)
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी भांडार व विकास विभाग
कळवा-ठाणे

विमाका/कोवि/२०२६-२०२७/१६०

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFX	Description	*Esti. Cost*
Tend-35/26-27 7000042119 .... 2nd call	Work of AMC work of various regular preventative maintenance / emergency and breakdown works and restoration of collapse tower of various 220kV & 100kV lines under EHV Line S/Dn Panvel-1 & 2 for F.Y. 2026-27.. **Tender Fee Rs. 5000/-+GST**	Limited Rs.125.00 Lakhs (Including all taxes)

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 23.11.2026 at 11:00 Hrs. to 02.12.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 02.12.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: The Executive Engineer (Adm)
Mobile No. 8412050202, E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

हातरिक्षाचालकांचे पुनर्वसन कागदावरच?

|| ९ डिसेंबरला विधानपरिषदेत सरकारला जाब || ई-रिक्षांसाठी निधीवर तारांकित प्रश्न

| कर्जत | प्रतिनिधी |

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होऊनही माथेरानमधील हातरिक्षाचालकांचे ई-रिक्षांच्या माध्यमातून पुनर्वसन रखडले आहे. चालकांना ई-रिक्षा मिळणार कधी आणि पुनर्वसनासाठी निधी देणार कोण, या प्रश्नांवर आता सरकारला विधानपरिषदेत उत्तर द्यावे लागणार आहे. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांना उद्देशून तारांकित प्रश्न उपस्थित केला असून, येत्या ९ डिसेंबरला या विषयावर सभागृहात चर्चा अपेक्षित आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार माथेरानमधील हातरिक्षा बंद करून



चालकांचे ई-रिक्षांच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, अद्याप सर्व पात्र चालकांचे पुनर्वसन झाले नसल्याचे समोर आले आहे. पुनर्वसनाची सद्यःस्थिती काय, विलंबाची कारणे कोणती आणि सरकारने यासाठी कोणती पावले उचलली, असे थेट सवाल आ. म्हात्रे यांनी उपस्थित केले आहेत.

माथेरानमधील पर्यावरणीय निकषांचे पालन करून ई-रिक्षा वाहतुकीला परवानगी दिली आहे का, त्यांचे मार्ग, परवाने, शुल्क आणि कार्यपद्धती काय आहे, याचाही खुलासा सरकारकडे मागण्यात आला आहे. पात्र हातरिक्षाचालकांना ई-रिक्षा खरेदी करून देण्यासाठी किंवा नाममात्र भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक तरतूद केली आहे का, असा महत्त्वाचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि रुग्णांना सुरक्षित व सुलभ वाहतूक सुविधा मिळण्यासह पर्यावरणाचा समतोल राखून सर्व पात्र हातरिक्षाचालकांचे पुनर्वसन करण्यासाठी सरकार कोणती कार्यवाही करणार, याकडे माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सप्टेंबरमध्ये शिवसेना नेते अनिल घोणे आणि नगरसेवक सचिन दाभेकर यांनी शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यासोबत बैठक आयोजित केली होती. या बैठकीत हातरिक्षाचालकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मांडण्यात आला होता. त्यानंतर हा विषय विधानपरिषदेत पोहोचल्याने रिक्षा संघटनेने आमदार म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.

पालिकेकडे निधीच नाही!

ई-रिक्षा प्रकल्पासाठी आतापर्यंत किती निधी खर्च झाला, याचा तपशीलही मागविण्यात आला आहे. प्रत्यक्षात ई-रिक्षा खरेदीसाठी पालिकेकडे पुरेसा निधी नसल्याने चालकांचे पुनर्वसन रखडल्याचे चित्र आहे. पर्यटनमंत्री शंभूराज देसाई हे निवडणुकीच्या प्रचारासाठी माथेरानमध्ये आले असताना त्यांनी ई-रिक्षांची संख्या वाढविण्याची ग्वाही दिली होती. त्यामुळे पर्यटन विभागाने पालिकेला निधी उपलब्ध करून दिल्यास पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होऊ शकतो, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

घोडेस्वारांच्या रोजगाराचाही मुद्दा

ई-रिक्षांची संख्या वाढविताना घोडेस्वारांच्या पारंपरिक व्यवसायावर परिणाम होऊ नये, याची काळजी घेण्याची मागणीही प्रश्नात करण्यात आली आहे. दुर्गम पर्यटनस्थळांपर्यंत ई-रिक्षा पोहोचू शकत नसल्याने तेथे घोड्यांचा वापर सुरू आहे. त्यामुळे अंतर्गत पर्यटनस्थळे आणि ट्रेकिंग मार्ग घोडेस्वार, पायी जाणारे पर्यटक आणि निसर्गासाठी सुरक्षित ठेवण्याबाबत सरकारची भूमिका काय, याचे उत्तरही अपेक्षित आहे.

निवडक



'जलजीवन'च्या रखडलेल्या कामांची चौकशी करणार : मधुकर पाटील

रोहा : जलजीवन पाणीपुरवठा योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध असतानाही नियोजनशून्य कारभारामुळे अनेक ठिकाणी कामे रखडली आहेत. यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या रखडलेल्या कामांची सखोल चौकशी करून दोषी ठेकेदारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी दिला. रोहा शासकीय विश्रामगृहात रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, तालुकाध्यक्ष महेंद्र पोटफोडे,कार्याध्यक्ष समीर शेडगे,प्रवक्ते ॲड. मनोज कुमार शिंदे, शहराध्यक्ष महेश सरदार, उपाध्यक्ष नितीन पिंपळे, नगराध्यक्षा वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी,जिल्हा युवक अध्यक्ष राकेश शिंदे, पं.स. उपसभापती संजय मांडलुस्कर,नंदकुमार म्हात्रे, नगरसेवक मयुर दिवेकर, अजित मोरे दिवस जैन आदी उपस्थित होते. रोहा शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. तत्पूर्वी शहरापासून जॅकवेलचे अंतर कमी करण्याचा विचार असून, नवीन जॅकवेलसाठी जागा हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कामाला गती देऊन लवकरच पाणी योजनेच्या कामाला सुरुवात करण्यात येईल, अशी ग्वाही नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी दिली.



● (छायाचित्र : उदय कळस)

आदिवासीवाडी शाळेला मंत्री आदिती तटकरेंची भेट

म्हसळा : म्हसळा येथील रायगड जिल्हा परिषद शाळा, आदिवासीवाडी येथे राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची, शाळेतील उपलब्ध सुविधांची तसेच शाळेच्या एकूण परिस्थितीची माहिती जाणून घेतली. शाळेच्या आवश्यक भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत एकूण ३० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आदिवासी वस्तीतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाळेकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती घेतली. शाळेच्या पटसंख्येबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी पंचायत समिती सभापती बबन मनवे, नगराध्यक्ष सुनील शेडगे, नाजीम हसवारे, प्रांताधिकारी महेश पाटील, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, सतीश शिगवण, नायब तहसीलदार खोत, रियाज घराडे, जिल्हा परिषद सदस्य अनिल बसवत, माजी नगराध्यक्ष संजय कर्णिक, माजी नगराध्यक्ष अनिकेत पानसरे, नगरसेविका जयश्री कापरे, नगरसेविका सरोज म्हशीलकर, शहराध्यक्ष रियाज घराडे, शाहिद उकये, प्रकाश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.



बोलीची खरी शक्ती उच्चारातील लयबद्धता : पाटील

चिरनेर : कोणत्याही बोलीची शक्ती ही उच्चारातील लयबद्धता आणि शब्दधन हे फार महत्त्वाचे असते. प्रत्येक बोली ही शुद्ध भाषा असते. ती समृद्ध करण्याची जबाबदारी बोलीतील प्रत्येक व्यक्तीची असते, असे मत साहित्यरत्न एलबी पाटील यांनी मांडले. नेरूळ तेरणा कॉलेज येथे महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, नवी मुंबई यांनी आयोजित केलेल्या जिल्हा साहित्य संमेलनात बोलीभाषा, सौंदर्य आणि मराठी या विषयाच्या परिसंवादाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यापुढे बोलताना एल बी पाटील यांनी आगरी बोलीतील वास्तवाचे अनेक दाखले देताना आगरी पट्ट्यातील आगार, आगरी, शेतकरी, बेलापूर किल्ला यांची चांगली माहिती दिली. दरम्यान, उपस्थित मान्यवरांनीही बोलीभाषेविषयी आपापले मत व्यक्त केले. तसेच आपली भाषा टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा, असे आवाहन केले. शैलजा शेवडे यांनी अहिराणी बोलीचे मराठीतील योगदान देताना, ओव्याचे मधुर आवाजातील सादरीकरण श्रोत्यांना आवडले. जयवंत पाटील यांनी विविध बोलींचे महत्त्व सांगून म्हणी, उखाणे यांना आपल्या भाषणात उदाहरणासह उत्तम मांडले. हा परिसंवाद फारच रंगतदार झाला. सूत्रसंचालन सुचल पाटील यांनी केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०

● नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अपघातात ट्रेलरचालकाचा मृत्यू

| खोपोली | प्रतिनिधी |

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भरधाव ट्रेलरवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने पुढे जाणाऱ्या ट्रकला मागून जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात ट्रेलरचालकाचा मृत्यू झाला, तर ट्रेलरमधील क्लिनर, ट्रकचालक आणि ट्रकचा क्लिनर जखमी झाले. अपघातात दोन्ही वाहनांचेही मोठे नुकसान झाले. ही घटना २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास खालापूर तालुक्यातील आडोशी गावाच्या हद्दीत मुंबई लेनजवळ घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ट्रेलरचालक लोणावळ्याच्या दिशेने मुंबईकडे जात होता. यावेळी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याने ट्रेलर भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालविला. त्यामुळे ट्रेलरवरील नियंत्रण सुटून त्याने पुढे जाणाऱ्या के.ए. ५६६५६४ क्रमांकाच्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या धडकेमुळे ट्रक रस्त्यावर पलटी झाला.

या अपघातात ट्रेलरचालकाच्या डोक्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. त्यात त्याचा मृत्यू झाला. ट्रेलरमधील क्लिनर तसेच ट्रकचालक आणि त्याचा क्लिनर जखमी झाले. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार लहु गोंधळी पुढील तपास करीत आहेत.

गोवेलेतील तळे आटले; पुनरुज्जीवनाची गरज!

■ प्रशासनाने लक्ष देण्याची ग्रामस्थांची मागणी

| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर तालुक्यातील गोवेले ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील तळ्याची वाडी या लोकवस्तीची ओळख असलेले गाव तलाव पाण्याअभावी आटले आहे. गाळाने भरलेल्या या तलावाची पाणी साठवण क्षमता घटल्याने भविष्यात पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तलावातील गाळ काढून त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ग्रामपंचायत आणि प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

काही वर्षांपूर्वी मुख्यमंत्री सामाजिक विकास अभियानात समाविष्ट झालेल्या गोवेले ग्रुप ग्रामपंचायतीमधील या तलावाचे पाणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यातच आटले आहे. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाने याकडे लक्ष देऊन तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

दरम्यान, राज्य शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी गाळयुक्त शिवार योजनेला कायमस्वरूपी मान्यता दिली आहे. या योजनेतून जुन्या तलावांमधील गाळ काढणे, खोली वाढविणे, पाणी साठवण क्षम ता वाढविणे आणि काढलेला सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकणे अशी कामे करता येतात. तलावातील पाणी अधिक काळ टिकवून भूजल पातळी वाढविण्यासाठीही या योजनेचा उपयोग होऊ शकतो. त्यामुळे गोवेले तळ्याची वाडी येथील तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी या योजनेचा लाभ घेण्याची गरज आहे. विशेष म्हणजे, पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रायगड जिल्ह्यात पालकमंत्री बळीराजा चारा संजीवनी योजनेंतर्गत तळ्याची वाडी येथील गायरान माळावरील गवत कापणी करून चारा पाठविण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. मात्र, याच परिसरातील गावाची ओळख असलेला तलाव आटून गाळाने भरल्याची बाब उपस्थित लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आली नाही. चारा संजीवनीसोबतच गावातील पाणी साठवण क्षमता वाढविण्याकडेही लक्ष देण्याची गरज ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

केएमजी विभागातील विहिरीची दुरवस्था

■ साफसफाई, डागडुजी करण्याची ग्रामस्थांची मागणी

| नागोठणे | प्रतिनिधी |

केएमजी विभागातील नागरिकांची वर्षानुवर्षे तहान भागवणारी इतिहास काळापासून शृंगार तळ्याजवळ अस्तित्वात असणाऱ्या सार्वजनिक विहिरीची दुरवस्था झाली आहे. विहिरीतील पाणी दूषित झाले असून, ते पिण्यायोग्य करावे तसेच नादुरुस्त विहिरीची डागडुजी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी नागोठणे ग्रामपंचायतीकडे केली आहे.

नागोठणे येथील केएमजी विभागात इतिहास काळापासून शृंगार तलावाजवळ न आटणारी विहीर अस्तित्वात आहे. पूर्वीच्या काळात उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई असायची तरीसुद्धा या विहिरीत पाणी असायचे. त्या टंचाई काळात विभागातील प्रत्येक कुटुंबाला चार ते



पाच हंडे पिण्याचे पाणी मिळायचे. पाण्याचे स्तोत्र या विहिरी व तलावे असल्याने यातील पाण्याचा उपयोग प्राण्यांना, माणसांना व्हायचा. पूर्वी ग्रामपंचायत पावसाळ्याच्या अगोदर अशा सार्वजनिक विहिरींची साफसफाई करीत होती जेणेकरून पावसाचे विहिरीत पडलेले पाणी स्वच्छ पिण्यालायक होईल. परंतु, आता विहिरीतील पाण्याचा वापर कमी होऊ लागला, त्यामुळे पावसाळा पूर्वी ग्रामपंचायतीकडून होणारी विहिरींची साफसफाई तसेच डागडुजी काही विहिरींचा अपवाद वगळता झालीच नाही.

त्यानुसार या विहिरीचे दगडांचे स्ट्रक्चर तसेच प्लॅस्टर निघालेले असून विहीर चारही बाजूने खालून लिकीज असून, तलावाचे दूषित पाणी या विहिरीमध्ये जाऊन बारा महिने ही विहीर तुडुंब भरलेल्या अवस्थेत असून, तिचे पाणी हिरवेगार झालेले आहे.

वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई

| अलिबाग | प्रतिनिधी |

वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या वाहनचालकांविरोधात रायगड पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक शाखेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकाच दिवशी ३१४ जणांवर कारवाई केली. या कारवाईत तब्बल ३ लाख ३ हजार ७०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. २१ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. यामध्ये नियमभंग करणाऱ्या ३१४ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. वाहतुकीचे नियम पाळावेत आणि अपघात टाळावेत, यासाठी पोलिसांकडून ही मोहीम राबविण्यात आली.



संविधान सन्मान रॅलीत शेकडो कार्यकर्ते सहभागी होणार

| नेरळ | प्रतिनिधी |

वंचित बहुजन आघाडीकडून २५ नोव्हेंबर रोजी संविधान सन्म ान महासभा भारावली जाणार आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या संविधान संक्रमण रॅलीमध्ये कर्जत तालुक्यातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. त्यानिमित्ताने बैठक कर्जत येथील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यालयात आयोजित केली होती.

संविधान सन्मान रॅली मध्ये सहभागी व्हावे यासाठी नियोजन बैठक कर्जत येथे वंचित बहुजन आघाडीने आयोजित केली होती. या नियोजन बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव धर्मेंद्र मोरे, जिल्हा संघटक सुनील गायकवाड, तालुका अध्यक्ष प्रदीप ढोले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार

| खोपोली | प्रतिनिधी |

फेसबुकवरून झालेली ओळख, त्यानंतर मैत्री आणि प्रेमाचे आमिष दाखवून महिलेचे शारीरिक शोषण केल्याचा गंभीर प्रकार खोपोलीत उघडकीस आला आहे. तब्बल नऊ वर्षांच्या कालावधीत महिलेच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप असून, मुख्य आरोपीला पाठीशी घालण्यासाठी अन्य पाच जणांनी संगनमत केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी सहा जणांविरोधात खोपोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जानेवारी २०१७ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आरोपी क्रमांक एक याची महिलेशी फेसबुकद्वारे ओळख झाली. त्यानंतर २०१७ मध्ये प्रत्यक्ष भेटून त्याने मैत्री केली आणि प्रेमाचे आमिष दाखवून महिलेचा विश्वास संपादन केला.

यानंतर महिलेच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. तसेच अन्य आरोपी क्रमांक २ ते ६ यांनी संगनमत करून मुख्य आरोपीला पाठीशी घातल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

दिवा-पनवेल मार्गावर पॉवर ब्लॉक

■ रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकात बदल

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

दिवा-पनवेल रेल्वे मार्गावर २२ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत मध्य रेल्वेकडून पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम होणार असून, काही लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस गाड्यांचे नियमन करण्यात येणार आहे. तर काही गाड्या निर्धारित वेळेपेक्षा उशिराने रवाना होणार आहेत. त्यामुळे या कालावधीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी रेल्वेचे सुधारित वेळापत्रक लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पॉवर ब्लॉकमुळे मंगळुरू जंक्शन-मुंबई सीएसएमटी एक्स्प्रेस (१२१३४) ही गाडी २२ ते २८ नोव्हेंबरदरम्यान आपटा स्थानकात ५० मिनिटे थांबविण्यात येणार आहे. मडगाव-मुंबई सीएसएमटी कोकणकन्या एक्स्प्रेस (२०११२) ही गाडी याच कालावधीत सोमटणे स्थानकात १० मिनिटे थांबविण्यात आहे. एर्नाकुलम-पुणे एक्स्प्रेस (२२१४९) ही गाडी २४, २७ आणि २८ नोव्हेंबर रोजी आपटा स्थानकात १०९ मिनिटे थांबविण्यात येणार आहे.

दरम्यान, लोकमान्य टिळक टर्मिनस-मडगाव एक्स्प्रेस (११०९९) ही गाडी २४, २७, २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी निर्धारित वेळेपेक्षा १२० मिनिटे उशिराने सुटणार आहे. तर लोकमान्य टिळक टर्मिनस-करमाळी सुपरफास्ट एक्स्प्रेस (२२११५) ही गाडी २६ नोव्हेंबर रोजी दोन तास उशिराने रवाना होणार आहे.

या कालावधीत प्रवाशांची गैरसोय होऊ नये तसेच रेल्वे स्थानक परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक नागेश यमगर यांनी केले आहे.

कोकणातील सात जिल्ह्यांतील जनमत जाणून घेतले | **अभिप्राय नोंदविण्यासाठी मुदतीत वाढ**

समान नागरी संहितेवर जनसुनावणी पूर्ण

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

समान नागरी संहितेच्या मुद्द्यावर नागरिकांच्या भावना, सामाजिक वास्तव आणि विविध धार्मिक-सांस्कृतिक दृष्टिकोन सम जून घेण्यासाठी समितीने कोकणात जनसुनावणीचा धडाका लावला. ठाणे, रायगड आणि रत्नागिरीसह कोकण विभागातील सात जिल्ह्यांतील जनसुनावणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, नागरिकांनी मांडलेल्या सूचना आणि भूमिकांचा समिती अभ्यास करणार आहे. समानता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा समतोल राखण्यावर समितीने भर दिला.



कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात जनसुनावणीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील नागरिकांशी संवाद साधण्यात आला. पहिल्या दिवशी मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील नागरिकांची मते जाणून घेण्यात आली. विवाहाचे कायदेशीर वय व नोंदणी, वैवाहिक हक्क, घटस्फोट, वारसा-उत्तराधिकार आणि लिव्ह-इन संबंधांतील अधिकार व संरक्षण या चार प्रमुख विषयांवर समितीने नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले.

या जनसुनावणी समितीमध्ये माजी न्यायमूर्ती संजय मेहरे, उत्तराखंडचे माजी मुख्य सचिव शत्रुघ्न सिंह, माजी मुख्य सचिव दिनेशकुमार जैन, माजी महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुवर्णा रावल, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, समितीच्या सचिव वर्षा ठाकूर-घुगे, विधी सल्लागार तन्वी आनंद आणि जय संकलेचा यांचा समावेश होता.

प्रत्यक्षउपस्थितराहूनशकणाऱ्या नागरिकांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयांतून दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागाची सुविधा देण्यात आली आहे. तसेच शासनाच्या अधिकृत समान नागरी कायदा संकेतस्थळावर ३७ मुद्द्यांवर ऑनलाइन अभिप्राय नोंदविता येणार असून, त्यासाठीची मुदत १५ डिसेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

डिलिव्हरी बॉयनेच लांबवले तीन लाखांचे दोन आयफोन

। पनवेल । प्रतिनिधी ।

वस्तूंच्या सुरक्षित वितरणाची जबाबदारी असलेल्या डिलिव्हरी बॉयनेच दोन महागडे आयफोन लंपास केल्याचा प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे. खारघर येथील क्रोमा शोरूममधून पनवेल शाखेत पोहोचवण्यासाठी दिलेले दोन आयफोन १७ प्रो त्याने गंतव्यस्थळी न पोहोचवता परस्पर लांबवले. या फोनची किंमत दोन लाख ६९ हजार ८०० रुपये असून, अभिषेक जयपाल सिंग (३०) असे संशयित आरोपीचे नाव आहे. खारघर पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पनवेल येथील क्रोमा शाखेला दोन आयफोनची आवश्यकता असल्याबाबत खारघर शाखेला ई-मेलद्वारे कळवण्यात आले होते. त्यानुसार पोर्टर कंपनीच्या माध्यमातून डिलिव्हरी करणारा अभिषेक सिंग खारघर येथील क्रोमा शोरूममध्ये आला. त्याने दोन आयफोन ताब्यात घेतले. मात्र, हे फोन पनवेल शाखेत पोहोचवण्याऐवजी त्यांचा अपहार केल्याचा आरोप आहे. ठरलेल्या वेळेत आयफोन पनवेल शाखेत न पोहोचल्याने तेथील कर्मचाऱ्यांनी चौकशी सुरू केली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी खारघर पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आरोपीचा शोध घेतला जात आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

अलिबाग नगरपरिषद, अलिबाग

जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२६ दि.

अ. क्र.	अनुसूची	अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	२	१६५६/१ /०४२३५	को.ए.सो.हायस्कुलजवळ अलिबाग	तळमजला, वाणिज्य गाळा क्र.०१	केतन वसंत तारकर	रूपेश गणेश म्हात्रे निता रूपेश म्हात्रे
२	२	४२३/००५१०	ठिकरूळ नाक्याजवळ, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१(५)	सुनील कृष्णा घोले	समिर राजाराम चव्हाण
३	२	१२७ श्रीबाग २/०२७२६	श्रीबाग नं.२, अलिबाग	सदनिका क्र. त प	गिता रमणीक पटेल व व मिता जयेश पटेल	हर्षल रमणिक पटेल
४	२	१५६४/ब/०५१३९	एस.टी.स्टँडजवळ अलिबाग	दुसरा मजला निवासी सदनिका क्र.१५	सबीहा आबीद शेख आबीद अब्दुल रहेमान शेख	रिझवान सुलतान बरमारे
५	२	६८६ बी विंग/०३६११	घरत आळी, अलिबाग	पहिला मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. १०२ व १०३	शशी बाळकृष्ण शाह	रविंद्र उत्तम पाटील
६	२	१३४७B/०१६१३	ब्राम्हणआळी, अलिबाग	दुसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. २०२/२.	मदन जानू शेळके	विलास रामभाऊ भोईर
७	३	४०श्रीबाग२/०२५७३	श्रीबाग नं.२, अलिबाग	सदनिका क्र.१ व १०१	प्रभावती एकनाथ ठाकूर	सागर अनिल ठाकूर
८	२	५०३/३/०५१७५	चेंढरे, अलिबाग	सदनिका क्र. २०३	म्हात्रे बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर नितीन सुर्यकांत म्हात्रे	ओंकार चंद्रकांत नेटके व दिपाली ओंकार नेटके
९	२	३३/३५/०४१८४	जुन्या मार्केटजवळ अलिबाग	तिसरा मजला, सदनिका क्र.३०७	उझेफ कामरूद्दीन काझी व नफिसा कामरूद्दीन काझी	मैमुनिसा अब्दुल रहीम कुदेकर
१०	२	१५२७/०१८७१	एस टी स्टॅण्ड राम मंदिर रोड, अलिबाग	पहिला मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र.१९	शकुंतला राजनारायण मिश्रा	निकिता चंद्रकांत वर्तक
११	२	११८/०१३९१	मारूतीनाक्याजवळ अलिबाग	रेज्ड दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०४	अमित अनंत दळवी	लोकेश पुष्पराज सोलंकी व दर्शना लोकेश सोलंकी
१२	३	१०७७ Aविंग/२०	पागाची गल्ली, अलिबाग	चौथा मजला, ए विंग, सदनिका क्र.४०३	सुमित्रा मोहनलाल जैन, हर्षल मोहनलाल जैन, व प्रेमलता तपन जैन	दिलीप मोहनलाल जैन
१३	२	६३५/००८६४	चेंढरे, अलिबाग	तळमजला, सदनिका क्र. जी 1	वैशाली नामदेव सानकर	चिराग अशोक म्हात्रे
१४	२	१२९५अ/५	बालाजीनाक्याजववळ, अलिबाग	पहिला मजला, कमर्शिअल गाळा क्र. १०२	मोहम्मद अमिन खान	प्रेमलता तपन जैन
१५	२	८२५/०१११३	जुन्या पोस्टाची गल्ली, अलिबाग	पहिला मजला, सदनिका क्र.१०४	गरीबुल्लाह जमीदर शाह	अख्तर हुसेन अहमद हुसेन शाह
१६	२	१४८३डी विंग/०४०९३	स्टेट बँक जवळ, अलिबाग	चौथा मजला, सदनिका क्र.डी.४०१	मे इनामोर रिॲल्टी प्रायवेट लि तर्फे डायरेक्टर अशोक छगनलाल ठक्कर तर्फे अखत्यारी संतोष श्यामराव कुंभारे	गुलाबचंद शाह व रसिला गुलाबचंद हरिया
१७	२	१७७ श्रीबाग२/०२७६२	श्रीबाग२, अलिबाग	सदनिका क्र.१	विद्याधर गणेश शिरसाट	रतनबेन लखमसी देढीया
१८	३	१६००/५Awing/०४४८६	ब्राम्हणआळी, अलिबाग	पहिला मजला, ए विंग, सदनिका क्र.१०३	यशवंत बाळकृष्ण पराडकर	संदीप यशवंत पराडकर
१९	३	१६००/३Awing/०४४८२	ब्राम्हणआळी, अलिबाग	तळ मजला, ए विंग, शॉप क्र.१०१	यशवंत बाळकृष्ण पराडकर	संदीप यशवंत पराडकर
२०	३	१६००/८Awing/०४४८४	ब्राम्हणआळी, अलिबाग	पहिला मजला, ए विंग, शॉप क्र.१०१	यशवंत बाळकृष्ण पराडकर	संदीप यशवंत पराडकर
२१	३	१६००/३Awing/०४४८६	ब्राम्हणआळी, अलिबाग	दुसरा मजला, ए विंग, सदनिका क्र.२०३	यशवंत बाळकृष्ण पराडकर	संदीप यशवंत पराडकर
२२	३	१४८३ सी विंग/०४०९२	स्टेट बँक जवळ, अलिबाग	तिसरा मजला, सदनिका क्र.सी-३०४	मे इनामोर रिॲल्टी प्रायवेट लि तर्फे डायरेक्टर अशोक छगनलाल ठक्कर तर्फे अखत्यारी संतोष श्यामराव कुंभारे	देवचंद श्यामजी हरिया व विद्या देवचंद हरिया
२३	२	७८८/०३८३८	गुजराती हॉलजवळ, बाजारपेठ, अलिबाग	तळमजला, ए विंग व्यापारी गाळा क्र. ए-०१	भवानजी बालजी शहा तर्फे अखत्यारी दिपक भवानजी शहा	विवेक मनोहर पाटील
२४	२	८३०अे विंग/०१११८	जुन्या पोस्टाची गल्ली, अलिबाग	तळमजला सदनिका क्र.३	रविंद्र अनंत टिल्लू	श्रीकांत अनंत टिल्लू
२५	२	८३०अे विंग/०११२०	जुन्या पोस्टाची गल्ली, अलिबाग	दुसरा मजला, सदनिका क्र.२०२	रविंद्र अनंत टिल्लू	विद्याधर अनंत टिल्लू
२६	२	१८९८/अे विंग/०२२४८	रामनाथ रोड, अलिबाग	दुसरा मजला, ए विंग, सदनिका क्र.अे २०३	विलास सुरेश कोकणे व प्राजक्ता विलास कोकणे	राहुल महादेव पाटील व समिता राहुल पाटील
२७	२	२-feb/000008	जुने भाजी मार्केट जवळ, अलिबाग	दुसरा मजला, सदनिका क्र.२०३(३०३)	मॅनिजिंग डायरेक्टर विजय प्रभाकर फडणिस साहिल स्पा ॲग्रीफिल्ड ॲन्ड फार्म	फडणिस रिसॉर्ट ॲन्ड स्पा इंडिया लि.तर्फे मॅनिजिंग डायरेक्टर पल्लवी सिंह
२८	२	२-feb/000008	जुने भाजी मार्केट जवळ, अलिबाग	दुसरा मजला, सदनिका क्र.२०१(३०१)	मॅनिजिंग डायरेक्टर विजय प्रभाकर फडणिस साहिल स्पा ॲग्रीफिल्ड ॲन्ड फार्म	फडणिस रिसॉर्ट ॲन्ड स्पा इंडिया लि.तर्फे मॅनिजिंग डायरेक्टर पल्लवी सिंह
२९	२	२-feb/000008	जुने भाजी मार्केट जवळ, अलिबाग	दुसरा मजला, सदनिका क्र.२०२(३०२)	मॅनिजिंग डायरेक्टर विजय प्रभाकर फडणिस साहिल स्पा ॲग्रीफिल्ड ॲन्ड फार्म	फडणिस रिसॉर्ट ॲन्ड स्पा इंडिया लि.तर्फे मॅनिजिंग डायरेक्टर पल्लवी सिंह
३०	३	१२३८ अे विंग/०१५०७	मारूतीनाका, समुद्र रोड, अलिबाग	तळमजला, ए विंग, दुकान गाळा क्र.०१,	विराज प्रकाश पवार	प्रकाश गेनबा पवार
३१	२	१३६८/०५०८१	ब्राम्हणआळी, अलिबाग	तिसरा मजला, सदनिका क्र.३०४	मे दिपम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार मोहनीश दिलीप जोग व दिपा दिलीप जोग	नितीन मनोहर प्रधान व मृण्मई अजय दोंदे
३२	२	१५९५/०५१५१	रामनाथ रोड, अलिबाग	तिसरा मजला, सदनिका क्र.३०१	मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकिन अजमेरा	चेतन दत्तात्रेय पाटील
३३	२	१५४३ब/०१८१५	पी.एन.पी.नगर अलिबाग	पहिला मजला, सी विंग, निवासी सदनिका क्र. १०२	भरत रामचंद्र नांदगांवकर	महेश शांताराम शिंदे व पुजा महेश शिंदे
३४	३	१७७श्रीबाग२/०२७६२	श्रीबाग २, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१	सचिन अनंत काफरे	स्वाती इंद्रजित सिनकर
३५	२	८०५/०४०३७	चावडी मोहल्ला, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०४	श्रेम कॉर्डो अपार्टमेंट प्रायवेट लिमिटेड तर्फे नुरूद्दीन जहांगिर सय्यद	नवाब अबू पल्लवकर व काफिया नवाब पल्लवकर
३६	२	१५९क/डी विंग/०१९०९	ब्राम्हणआळी, अलिबाग	तळमजला, सदनिका क्र.०१२	मे रसिका कंन्स्ट्रक्शन तर्फे पार्टनर श्री.जयंत मधुकर वाखारकर	प्रसन्न दत्तात्रेय जोशी
३७	२	५४६/ब(बिल्डिंग C)B wing/०५०९९	चेंढरे, अलिबाग	पहिला मजला, बी विंग सदनिका क्र.१०१	संदेश विनायक कोळगावंकर	मनोहर काशिनाथ नाईक व मनिषा मनोहर नाईक

मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मौजे श्रीगांव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील निम्नलिखीत वर्णनाची जमीन मिळकतीमधील ०.९६.३० हे. आर क्षेत्राची जमीन मिळकत ही स्मिता हरिश्चंद्र म्हात्रे रा. श्रुती फार्म, तळप्रशेत रोड, नवेनगर श्रीगाव ता. अलिबाग, जि. रायगड यांचे खुद्द मालकीची आहे. सदर जमीन मिळकतीपैकी ०.१६.०० हे. आर ही माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले असून त्याबाबतची विक्री व्यवहाराची प्राथमिक बोलणी विद्यमान मालक व माझ्या अशिलांमध्ये झालेली आहे. सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसल्याही तऱ्हेचा कायदेशीर हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकतीबाबत बयाणा, साठेकरार, तारण, गहाण, दान, खरेदीखत अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ७ (सात) दिवसाचे आंत निम्मलिखीत पत्त्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमीन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती या जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू जमीन मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. हे कळावे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकारणी (रू.पैसे)
श्रीगांव ता.अलिबाग, जि. रायगड.	२८५	०.८१.७० पो.ख. ०.३०.६० एकूण क्षेत्र १.१२.३०	४.५६

(उक्त जमीन मिळकतीमधील स्मिता हरिश्चंद्र म्हात्रे यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ०.९६.३० हे. आर हे. आर आकार रू ३.६७ पैसे या जमीन मिळकतीपैकी ०.१६.०० हे. आर क्षेत्र या नोटीसचा विषय आहे.)

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २३/११/२०२६.

डॉ. ॲड.निहा राऊत
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मोबाईन नं. ९८२२०६८५२६

अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात

कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम १४ अन्वये
पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

नोटीस दावा क्रमांक ०३/२०२६

१. श्री. बळीराम शंकर आनंदकर (मयत) वारस
१/१. श्रीम. प्रमिला बळीराम आनंदकर (मयत) वारस
१/२. श्रीम. लक्ष्मी बळीराम आनंदकर
रा.एस आर नं.५०, गल्ली नं. २७,
गणपती मंदिर, भाग्योदय नगर, कोडंवा खुर्द,
पुणे सिटी, पुणे ४११०४८.
२. श्री. शिवकुमार शंकर आनंदकर (मयत) वारस
२/१. श्रीम. शोभा शिवकुमार आनंदकर
रा. १७२, बीच टॉवरर्स कन्डोमिनियम वादी/अर्जदार
पी बल्यु मार्ग, टाटा प्रेस मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
२/२. श्रीम.निला प्रसाद त्रिलोकेकर
रा.त्रिलोक ३२१, दुसरा मजला, चित्रकार धुरंधर मार्ग, खार वेस्ट,
मुंबई ४०० ०५२ सध्या रा. युनायटेड किंगडम
३. श्री. दत्तकुमार शंकर आनंदकर (मयत) वारस
३/१. श्रीम.आशा दत्ता आनंदकर (मयत) वारस
३/२. श्री. विक्रम दत्ता आनंदकर
रा. फ्लॅट नं. १९०२, अे - विंग, १९ मजला,
ओमकार वेदा टॉवर, जी. डी. आंबेकर मार्ग,
एकनाथ घाडी मार्ग, परेल व्हीलेज, परेल, मुंबई ४०० ०१२.
४. श्रीम. कल्पना मधुकर कोठारे (मयत) वारस
४/१. श्री. तुषार मधुकर कोठारे
४/२. श्रीम. कांचन भुषण प्रधान
अ.क्र.४/१ व ४०२, रा. फ्लॅट नं.७०२,
ओम पॅरडाईस, प्लॅट नं. ७२, सेक्टर ५० ई,
नेरुळ वेस्ट, नवी मुंबई ४०० ७०६.
५. श्रीम. किशोरी शंकर त्रिलोकेकर (मयत) वारस
५/१. श्री. प्रसाद शंकर त्रिलोकेकर
रा.त्रिलोक ३२१, दुसरा मजला, चित्रकार धुरंधर मार्ग,
खार वेस्ट, मुंबई ४०० ०५२.
५/२. श्रीम. प्रनोती मिलिंद किर्तीकर
रा.७०२, पिल्लई को. ऑ.हौ.सो.लि.,
विर देसाई रोड, अंधेरी वेस्ट,
अंधेरा राजा गेट समोर, एनकेजीएसबी बँकेपुढे, मुंबई ४०००५३.
६. श्रीम. सुलभा जाल दुभाष
रा.७६/३०३, अश्वथ बिल्डींग,
पोखरोण रोड नं.२, वसंत विहार,
अपना बाझार, ठाणे ४०० ६१०.

विरुद्ध

१. श्री. जनार्दन शामराव शेलार (मयत)
२. श्रीम. सुधा मनोहर शेलार (मयत) प्रतिवादी/सामनेवाला
३. श्री. परमानंद मनोहर शेलार (मयत) वारस
३/१. श्री. सौरभ परमानंद शेलार
३/२. श्रीम. श्रद्धा परमानंद शेलार
अ.क्र. ३/१ व ३/२, रा.मु.पो.रेवदंडा,
ता.अलिबाग, जि.रायगड
४. श्री. उमेश मनोहर शेलार
५. श्रीम. अनिता जपत सावंत
६. श्रीम. स्नेहलता बाळकृष्ण पवार (मयत) वारस
६/१. श्रीम. प्रेमल बाळकृष्ण पवार
रा.मु.पो.रेवदंडा, ता.अलिबाग, जि. रायगड
७. श्रीम. मंगला यशवंत जाधव (मयत)
८. श्रीम. संगिता राकेश शर्मा
९. श्रीम. सुनिता लक्ष्मण यादव
१०. श्रीम. मालतीबाई माधव शेलार (मयत)
११. श्री. कृष्णशेखर माधव शेलार (मयत) वारस
११/१. श्री.शितल कृष्णशेखर शेलार
११/२. श्रीम. शैलजा कृष्णशेखर शेलार
अ.क्र. ११/१ व ११/२, रा.मु.पो.रेवदंडा,
ता.अलिबाग, जि.रायगड
१२. श्री. प्रकाश माधव शेलार प्रतिवादी/सामनेवाला
१३. श्रीम. कल्पना विनायक बडमजी
अ.क्र. १ ते १३ सर्व रा. मु. पो. रेवदंडा,
ता. अलिबाग, जि. रायगड
१४. श्री.विजयकुमार शंकर आनंदकर (मयत) वारस
१४/१. श्रीम.सुनिता विजय आनंदकर
१४/२. श्रीम. स्वप्ना विजय आनंदकर
अ.क्र. १४/१ व १४/२, रा. ५/५०३,
मयुरेश अपार्टमेंट खाडीलकर रोड, पे. हॉस्पीटलसमोर,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.
१५. श्रीम. अल्पना प्रशांत चवाथे
रा. अ-२, राम मंदिर ट्रस्ट बिल्डींग,
शितलादेवी मंदिर रोड, माहीम, मुंबई ४०००१६.
१६. श्री. शिवकुमार शंकर आनंदकर (मयत) वारस
१६/१. श्री. नितिन शिवकुमार आनंदकर
रा.१७२ बीच टॉवरर्स कन्डोमिनियम,
पी बल्यु मार्ग, टाटा प्रेस मार्ग, प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५ आणि सध्या रा.युनायटेड किंगडम

विषय - मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम १४ प्रमाणे

जमिनीचे वर्णन

गावाचे नाव	स.नं./ग.नं.	क्षेत्र हेक्टर आर	आकार रुपये पैसे
मौजे चौल दक्षिण भाग, ता.अलिबाग	२५४० (जुना स.नं. ६६०/०)	बागायत २-३५-७० पो.ख. ०-०७-६० एकूण २-४३-३०	१३६.९४

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम १४ नुसार कुळ हक्क समर्पित करणेकामी या न्यायालयात दि. २४/०६/२०२६ रोजी दावा/अर्ज दाखल आहे.

आता तुम्हास नियोजित कुळ हक्क समर्पित करणेविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०१/१२/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ०५/११/२०२६

सही/-
(विक्रम पाटील)
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण
अलिबाग- रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे सांडशी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक कॅजिटन फ्रान्सिस फर्नांडीस यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन
मौजे. सांडशी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
३१	०	२-३६-७० पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे ०-८०-०० क्षेत्र	८-५६

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
ता. २४/११/२०२६
मो. नं. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ॲड. समीर हरिश्चंद्र लाड
फ्लॅट नं.३०१, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यांत येते की, मौजे पालव, अलिबाग, जि. रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग ३८ पैकी मिळकत माझे खुद्द मालकीची, ताबेकब्जावहिवाटीची व कसवणुकीची आहे. मौजे पालव, क्रमांक व उपविभाग ३८, मौजे रेवदंडा जूना गट नं. २२५ ता. अलिबाग, जि. रायगड भुमापन हिस्से झालेले नाहीत. मौजे पालव ता. अलिबाग, जि. रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग या मिळकतीची आज पर्यंत पोट ३८/१, ३८/२, ३८/३, ३८/४, ३८/५, ३८/६, ३८/७ ब, ३८/८, ३८/९, ३८/१०, ३८/११ या मिळकती नफीसा आदिल भोलुभॉय, आदिल शरीफ भोलुभॉय, वासुदेवन राममुर्ती, ललिता वासुदेवन, मुस्तफा ख्वाजा हमीद, गीता अमर लुल्ला यांनी त्रयस्थ इसमांना विक्रीस काढली असल्याची खात्रीलायक बातमी मला मिळाली आहे.

परंतु सदर मौजे पालव, ता.अलिबाग, जि.रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग ३८ पैकी मौजे रेवदंडा जुना गट नं.२२५ पैकी या मिळकती बाबत मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर सो., अलिबाग यांचे न्यायालयात रे. मु. नं. ९/२०१६ चालू आहे.

तसेच मा. उपअधिक्षक भुमी अभिलेख अलिबाग सो., यांचे कडे क्र. भूमापन/मोजणी /त. अ./पालव/स.नं. ३८ व इतर/२०२६/४१२८ हे मोजणी अपील चालू आहे. तसेच मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग ३८ पैकी, जूना गट नं. २२५ पैकी रेवदंडा या मिळकतीवर रे.मु. नं.२३५/२०१८ हा दावा चालू आहे. तसेच मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग ३८ पैकी मिळकतीबाबत दि. १९/०६/२०२६ रोजी झालेल्या खरेदीखताचे फेरफार क्र. १९६०४, १९६०५ या दोन फेरफार मा. तहसिलदार अलिबाग यांचे आदेशाने रद्द केले आहेत.

त्यामुळे वर नमूद मिळकती विकत घेवू नये. याउपर सदर मिळकती हस्तांतरीत केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई मी करेन याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

दि. २१/११/२०२६.

सही/-
तुलसी विलास बुरांडे
रा. द्वारा मनोहर गजानन वैद्य, आक्षी स्तंभ,
आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. ९०२२०९६५२१.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सुब्रमण्यम कृष्णकुमार २) राहुल वसंत दामले यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु. पै.)
नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड	९२	०-४३-३० बागायत ०-००-०० पो.ख. ०-४३-३० एकुण क्षेत्र	८.४४

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीपैकी १) सुब्रमण्यम कृष्णकुमार २) राहुल वसंत दामले यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-३०-८० हे. आर., अशी बागायत मिळकत आहे त्यापैकी क्षेत्र ०-०५-१० हे. आर ., हि जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक- २३/११/२०२६

ॲड. राहुल रमेश नाईक
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री दिपक वसंत कार्ले यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १००/२ एकुण ०.०४.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २४/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स




मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट

निवडक

मुंबईत जिम्नॅस्टिक्सचा थरार

नवी दिल्ली : देशातील युवा जिम्नॅस्टिक्स खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. पहिल्या युथ आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन मुंबईत करण्यात आले आहे. मालाड पश्चिम येथील आयएनएस हमला येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा संकुलात २४ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२६ या कालावधीत ही स्पर्धा रंगणार आहे.




देशभरातील विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून ८०० हून अधिक खेळाडू, प्रशिक्षक, पंच आणि तांत्रिक अधिकारी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड आणि जिम्नॅस्टिक्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली इंडियन नेव्ही स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड या स्पर्धेचे आयोजन करणार आहे. स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया आणि आयएनएस हमला यांचेही या आयोजनाला सहकार्य लाभणार आहे. देशातील युवा जिम्नॅस्ट्सना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.या स्पर्धेत पुरुष आणि महिला गटांच्या स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित केल्या जाणार आहेत. पुरुषांची स्पर्धा २४ ते २६ नोव्हेंबरदरम्यान होणार असून, महिला गटातील खेळाडू २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत आपले कौशल्य सादर करतील. जिम्नॅस्टिक्समधील विविध प्रकारच्या कसरती, शारीरिक संतुलन, चपळता, ताकद आणि तांत्रिक अचूकता यांचे दर्शन या स्पर्धेत घडणार आहे.

अनुपमाने दुसऱ्यांदा पटकावले विजेतेपद

इंदूर : इंदूरच्या यशवंत क्लबमध्ये आयोजित वर्ल्ड स्नूकर चॅम्पियनशिप स्पर्धेची सांगता झाली. भारताच्या २४ वर्षीय अनुपमा रामचंद्रनने सलग दुसऱ्यांदा महिला गटाचे विश्वविजेतेपद जिंकून इतिहास रचला. अशी कामगिरी करणारी ती पहिली महिला खेळाडू ठरली आहे.महिला गटाच्या अंतिम सामन्यात अनुपमाने हाँगकाँगच्या सो मॅन यानचा ३-१ असा पराभव केला. या विजयासह तिने गेल्या वर्षी जिंकलेले आपले विजेतेपदही कायम राखले.दरम्यान, पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात इराणच्या ३२ वर्षीय अली घरहागोजलूने हाँगकाँगच्या २४ वर्षीय टॅम युन फंगचा ५-१ असा पराभव केला. अलीनेही दुसऱ्यांदा विजेतेपद जिंकले आहे.महिला गटाची अंतिम लढत विद्यमान चॅम्पियन अनुपमा रामचंद्रन आणि हाँगकाँगच्या सो मॅन यान यांच्यात झाली. सामन्यातील पहिली फ्रेम यानने ५८-१६ अशी जिंकून आघाडी घेतली.त्यानंतर अनुपमाने शानदार पुनरागमन केले. तिने दुसरी फ्रेम ८३-७ अशी जिंकून स्कोअर बरोबरीत आणला. त्यानंतर तिसरी फ्रेम ८५-२६ आणि चौथी फ्रेम ६५-३७ अशी जिंकत सलग तीन फ्रेम आपल्या नावावर केल्या.अनुपमाने संपूर्ण सामन्यात अचूक लक्ष्यभेद आणि शानदार खेळाचे प्रदर्शन केले. त्यांनी ३-१ असा विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा विश्वविजेतेपद पटकावले. या विजयासह त्यांनी गेल्या वर्षी दोहा येथे जिंकलेले विश्वविजेतेपदही कायम राखले. अनुपमा रामचंद्रन यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये दोहा येथे झालेल्या विश्व महिला स्नूकर चॅम्पियनशिपचे विजेतेपद जिंकले होते. अंतिम सामन्यात त्यांनी हाँगकाँगच्या एनजी ऑन यी यांचा ३-२ असा पराभव केला होता.

महाराष्ट्र संघाची झुंज अपयशी

मोहाली : महाराष्ट्राच्या क्रिकेट संघाने मध्य प्रदेशकडून मिळालेल्या २०९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कडवी झुंज दिली. मात्र पृथ्वी शॉ, साहिल पारख आणि अर्शीन कुलकर्णी यांनी आक्रमक अर्धशतकी खेळी केल्यानंतरही महाराष्ट्राच्या संघाला पाच धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. महाराष्ट्राचा सय्यद मुश्ताक अली या स्पर्धे तील क गटामध्ये तिसरा पराभव झाला.



मध्य प्रदेश संघाकडून महाराष्ट्राच्या संघासमोर २०९ धावांचे आव्हान ठेवण्यात आले. पृथ्वी शॉ व साहिल पारख या सलामी जोडीने ६.४ षटकांत ८६ धावांची धडाकेबाज भागीदारी करीत आश्वासक सुरुवात केली. मात्र शिवम शुक्लाच्या गोलंदाजीवर साहिल पारख ५० धावांवर बाद झाला आणि जोडी तुटली. त्याने आपल्या खेळीत पाच चौकार व चार षटकार मारले. पृथ्वी शॉने ५१ धावांची खेळी केली. तोही शिवांगकुमारच्या गोलंदाजीवर बाद झाला. ऋषीकेश सोनावणे १२ धावांवरच तंबूत परतला. कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि अर्शीन कुलकर्णी या जोडीने महाराष्ट्रासाठी मोलाची कामगिरी बजावली. कुमार कार्तिकेयने ऋतुराज गायकवाडला १४ धावांवर बाद केले. पण अर्शीन कुलकर्णी याने २६ चेंडूमध्ये नाबाद ५४ धावांची खेळी साकारत विजयाची आशा कायम ठेवली. त्याने आपल्या खेळीमध्ये सहा चौकार आणि दोन षटकार मारले. महाराष्ट्राला २० षटकांमध्ये सहा बाद २०३ धावांपर्यंत मजल मारता आली.

महिला हॉकी संघ विजयी

भोपाळ : गतविजेत्या भारतीय महिला हॉकी संघाने आपली विजयी घोडदौड कायम राखत महिला आशियाई चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत विजयाची हॅट्ट्रिक साजरी केली. स्पर्धेतील आपल्या तिसऱ्या साखळी सामन्यात यजमान भारताने थायलंडचा ७-० असा धुव्वा उडवला. सामन्याच्या चौथ्याच मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी स्ट्रोकवर गोल करीत नवनीत कौरने भारताचे खाते उघडले. त्यानंतर १० व्या मिनिटाला दीपिकाने गोल करून भारताची आघाडी दुप्पट केली. ११व्या मिनिटाला दीपिकाने आणखी एक गोल करीत भारताला ३-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. ३२व्या मिनिटाला सुनेलिता टोप्पो हिने पाचवा गोल करून भारताचा आक्रमक वेग कायम ठेवला. सामन्याच्या ५६व्या मिनिटाला दीपिकाने आणखी एक गोल करून आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली आणि थायलंडच्या अडचणींत आणखी भर घातली. त्यानंतर काही क्षणांतच नवनीत कौरने पुन्हा एकदा पेनल्टी स्ट्रोकवर गोल करीत भारताच्या या दणदणीत विजयावर शिक्कामोर्तब केले.



भारत-न्यूझीलंड सामना ड्रॉ

- हेन्री निकोल्सचा सामनावीर पुरस्काराने गौरव
- भारताची गोलंदाजी ठरली निष्प्रभ

। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला कसोटी सामना अनिर्णित राहिला. वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्ह मैदानावर सुरू असलेल्या सामन्यात पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी ८ विकेट्सची गरज होती. मात्र, न्यूझीलंडच्या फलंदाजांनी केलेल्या चिवट खेळीमुळे भारत विजयापासून दूर राहिला.

कारण भारताला फक्त ३ विकेट्स घेता आल्या, दुसरीकडे न्यूझीलंड संघाला हा सामना जिंकणे शक्य नव्हते, त्यामुळे त्यांनी सामना अनिर्णित राखला.

डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलिप्स या दोघांनी मैदानावर तळ ठोकला होता. भारताच्या एकाही गोलंदाजाला आऊट करता आले नाही. डॅरिल मिचेल याने १८६ चेंडूत नाबाद ४९ धावा तर ग्लेल फिलिप्सने १२६ चेंडूत नाबाद २६ धावा केल्या.

दुसऱ्या डावात भारताकडून प्रसिद्ध कृष्णा याने दोन तर बुमराह, वॉशिंग्टन आणि कंबोज यांनी प्रत्येकी एक-एक विकेट नावावर केली. दोन्ही संघांना जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे प्रत्येकी ४ गुण मिळाले आहेत.

पहिल्या कसोटी सामन्याचा आढावा

टॉस जिंकत पहिल्यांदा बॉलिंग करणाऱ्या भारताने सुरुवातीला न्यूझीलंडची अवस्था ५ बाद ७० अशी केली होती. मात्र, हेन्री निकोल्स (नाबाद १७५) आणि ग्लेन फिलिप्स (११८) यांच्या शतकांमुळे न्यूझीलंडने पहिल्या डावात ३६८ धावा केल्या.

प्रत्युत्तरादाखल भारतीय फलंदाजांनी विक्रमी कामगिरी केली. केएल राहुल आणि ऋषभ पंत यांची शतके, शुभमन गिलच्या ९८ धावा आणि यशस्वी जस्वाल आणि देवदत्त पडिक्कल यांच्या ८० पेक्षा जास्त धावांच्या खेळीमुळे भारताने ९ बाद ७२० धावांवर डाव घोषित केला. कसोटी इतिहासात पहिल्या सातही गड्यांसाठी ५०+ धावांची भागीदारी होण्याचा हा नवा विश्वविक्रम ठरला.

पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी ८ विकेट्सची गरज होती. भारताने ३ विकेट्सही घेतल्या, पण सहाव्या विकेटसाठी मिचेल आणि फिलिप्स यांनी तब्बल ४३ ओव्हर खेळून काढली. भारताने वेगवान गोलंदाज बदलून पाहिले आणि वॉशिंग्टन सुंदरनेही मोठा स्पेल टाकला, पण या जोडीचा बचाव भेदण्यात भारतीय गोलंदाजी अपयशी ठरली.



मिचेल-फिलिप्सची भिंत

दुसऱ्या डावात ३५२ धावांच्या पिछाडीसह खेळणाऱ्या न्यूझीलंडला पाचव्या दिवशी भारताने सुरुवातीचे धक्के दिले. डेव्हॉन कॉनवे (६५), रचिन रवींद्र (३७) आणि टॉम ब्लंडेल बाद झाल्याने न्यूझीलंडची अवस्था १७६-५ अशी बिकट झाली होती. मात्र, यानंतर डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलिप्स यांनी तब्बल ४३ ओव्हर खेळून काढत भारताच्या एकाही गोलंदाजाला यश मिळू दिले नाही. आकाश दीपने मिचेलला रनआऊट करण्याची सोपी संधी गमावणेही भारताला महागात पडले. दिवसाचा खेळ संपण्यापूर्वी एक तास आधी न्यूझीलंडने १२० ओव्हरमध्ये २३९-५ धावा केल्या असताना सामना अनिर्णित घोषित करण्यात आला. मिचेल ४९ (१८६ चेंडू) आणि फिलिप्स २६ (१२६ चेंडू) धावांवर नाबाद राहिले. पहिल्या डावात नाबाद १७५ आणि दुसऱ्या डावात ३१ धावा करणाऱ्या हेन्री निकोल्सला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

मुलांमध्ये पुणे; मुलींमध्ये अमरावती चॅम्पियन

। लातूर । वृत्तसंस्था ।

संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलच्या मैदानावर रविवारी झालेल्या राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात पुण्याच्या संघाने विजेतेपद पटकावले. कोल्हापूरचा संघ उपविजेता ठरला. मुंबई विभागाने तृतीय स्थान पटकावले असून, मुलींच्या गटात अमरावती संघाने बाजी मारली. नाशिक संघाने उपविजेतेपद पटकावले. तृतीय क्रमांकाच्या सामन्यात मुंबईने नाशिक विभागाचा अटीतटीच्या सामन्यात एका धावाने पराभव केला. मुलींच्या गटात अंतिम सामन्यात अमरावती विभागाने नाशिक विभागाचा ४-३ असा एकतर्फी पराभव करत विजेतेपद पटकाविले.

आरसीएफ उपांत्य फेरीत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर संघाची व्यवसायिक गटात उपांत्य, तर नवशक्ती अकॅडमीने महिला गटात उपांत्यपूर्व फेरीत धडक दिली. मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनने सुधीर मोरे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ४४ व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२६ चे आयोजन केले आहे.

व्यवसायिक गटात प्रदीर्घ कालावधी नंतर खेळणाऱ्या राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर संघाने उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्र वहातूक सेवाचा २६-०७ असा सहज पाडाव केला. नवोदित खेळाडूचा भरणा असलेल्या या संघाने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करीत पूर्वार्धात लोण देत १४-०४ अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात त्याच गतीने खेळ करीत दुसरा लोण देत आपला विजय पक्का केला. दीप सिंग, यश पाटील यांच्या चढाई पकडीच्या खेळाला याचे श्रेय जाते. या अगोदर झालेल्या सामन्यात राष्ट्रीय केमिकल आणि फर्टीलायझर संघाने शुभश्री इंटरप्रायझेसचा २७-१५ असा पाडाव केला होता.



महिला गटात नवशक्ती स्पोर्टस् अकादमीने महात्मा फुले स्पोर्टस् चा ३०-०९ असा धुव्वा उडवीत उपांत्यपूर्व फेरी गाठली. दोन्ही डावात १-१ लोण देत त्यांनी हा पराक्रम केला. वीणा थोरात, गायत्री देवळेकर यांच्या झंजावाती खेळाला याचे श्रेय जाते. पराभूत संघाची अर्पिता साखळे बरी खेळली. द्वितीय श्रेणी पुरुषांत उत्कृष्ट मंडळाने पहिल्या डावातील ०८-१२ अशा पिछाडीवरून अभिनय मंडळाचा प्रतिकार २२-२० असा मोडून काढत दुसरी फेरी गाठली.

क्रिकेटच्या मैदानावर चौकार-षटकारांचा थरार

डोक्यावरून क्रिकेटपटूंच्या विमानांची भरारी!



- पारगावच्या मैदानावर क्रिकेट सामने
- शेजारीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आकर्षण

। खांदा कॉलनी । वार्ताहर ।

पनवेल पारगाव येथील मैदानावर सध्या क्रिकेट सामन्यांचा उत्साह रंगला आहे. मैदानावर फलंदाजांच्या चौकार-षटकारांचा थरार सुरू असतानाच आकाशातून विमानांची होणारी ये-जा क्रिकेटप्रेमींसाठी आकर्षणाचा विषय ठरत आहे. एका बाजूला क्रिकेटचे सामने आणि दुसऱ्या बाजूला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची धावपट्टी, असे अनोखे चित्र सध्या या परिसरात पाहायला मिळत आहे.

विशेष म्हणजे, याच विमानतळावरून देशातील तसेच परदेशातील अनेक क्रिकेटपटू प्रवास करू शकतात. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंच्या प्रवासासाठीही हा विमानतळ महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे क्रिकेटच्या मैदानाशेजारीच विमानतळ असल्याने या परिसराला क्रिकेट आणि विमान वाहतूक अशा दोन्ही क्षेत्रांची विशेष ओळख मिळत आहे.

पारगावच्या मैदानावर सामने सुरू असताना विमानतळावर उतरण्यासाठी येणारी प्रवासी विमाने आकाशात अगदी स्पष्टपणे दिसतात. खेळाडू मैदानावर खेळण्यात मग्न असताना डोक्यावरून जाणाऱ्या विमानांकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधले जाते. काही क्षणांसाठी क्रिकेटचा सामना पाहणारे नागरिकही विमानांचे छायाचित्रण आणि व्हिडिओ करण्यासाठी उत्सुक होतात.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल आणि परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळत आहे. विमानतळाच्या विस्ताराबरोबरच या परिसरात पायाभूत सुविधांचा विकास होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भविष्यात विमानतळाच्या नियोजित विस्तारात चौथ्या धावपट्टीचा विषयही महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे सध्या क्रिकेट सामन्यांसाठी ओळखले जाणारे पारगावचे मैदान भविष्यात विमानतळ परिसरातील बदलांचे साक्षीदार ठरू शकते.

प्रवासी विमानांबरोबरच कार्गो विमानांची होणारी ये-जा या परिसरातील नागरिकांसाठी कुतूहलाचा विषय आहे. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीमुळे पनवेलचे नाव जागतिक नकाशावर अधिक ठळक होण्याची अपेक्षा आहे.

आज पारगावच्या मैदानावर स्थानिक क्रिकेटपटू फलंदाजी आणि गोलंदाजीचा सराव करत आहेत, तर आकाशात देश-विदेशातील प्रवाशांना घेऊन जाणारी विमाने झेपावत आहेत. भविष्यात याच विमानतळावरून प्रवास करणाऱ्या क्रिकेटपटूंच्या आणि मैदानावर क्रिकेट खेळणाऱ्या स्थानिक खेळाडूंच्या या परिसरातील सहअस्तित्वाचे चित्र निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे.

वयाच्या ५८ व्या वर्षीही तरुणाईचा जोश

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

वय हा केवळ आकडा असतो, हे तळोजातील भेल कंपनीत कार्यरत असलेले ५८ वर्षीय संतोष तेलंगे यांनी सिद्ध केले आहे. त्यांनी मुंबईत इंडियन नेव्हीच्या वतीने आयोजित २१.१ किलोमीटरची मॅरेथॉन २ तास ३४ मिनिटांत पूर्ण केली.



संतोष तेलंगे हे नोकरी सांभाळून आपली खेळाडूवृत्ती जपत आहेत. रविवारी मुंबईतील क्रॉस मैदान ते चर्चगेट स्थानक या मार्गावर झालेल्या मॅरेथॉनमध्ये राज्यभरातील ५ हजार ३३८ धावपटूंनी सहभाग घेतला होता. सकाळी ५ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेत तेलंगे यांनी कुठेही न थांबता २१.१ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले. आतापर्यंत त्यांनी १० किलोमीटरची एक, २१.१ किलोमीटरच्या पाच आणि ५० किलोमीटरच्या तीन मॅरेथॉन पूर्ण केल्या आहेत. इंडियन नेव्हीच्या वतीने आयोजित मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याची ही त्यांची दुसरी वेळ होती. या कामगिरीबद्दल त्यांना विशेष पदक देऊन गौरविण्यात आले. तेलंगे यांनी महिमगिरी ट्रेकर्सफ या संस्थेची स्थापना केली असून, या माध्यमातून ते तरुणांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांना गड-किल्ले, डोंगरदऱ्या आणि बर्फाळ प्रदेशात ट्रेकिंगसाठी घेऊन जातात.

गडकिल्ले बांधणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

- श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळातर्फे प्रथमच स्पर्धेचे आयोजन
- शहरी आणि ग्रामीण विभागातील विजेत्यांना पारितोषिक वितरण

। महाड । प्रतिनिधी ।

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, स्थानिक उत्सव समिती, महाड यांच्या वतीने आयोजित गडकिल्ले बांधणी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी महाड येथील जनकल्याण रक्त केंद्रात उत्साहात पार पडला. महाड आणि पोलादपूर तालुक्यातील स्पर्धकांनी या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेसाठी शहरी आणि ग्रामीण असे दोन विभाग करण्यात आले होते. स्पर्धकांना किल्ले रायगड, राजगड किंवा सिंधुदुर्ग यापैकी एका किल्ल्याची प्रतिकृती साकारण्याचे आवाहन करण्यात आले होते.

ग्रामीण विभागात शिवप्रतिष्ठान, नाते यांनी प्रथम क्रमांक पटकावला. श्रेयस पवार (सोलमकोंड) याने द्वितीय, गावदेवी प्रसन्न (काचले) यांनी तृतीय, जय हनुमान (गावडी) यांनी चतुर्थ, तर कु. सुदिक्षा गायकवाड (नाते) हिने पाचवा क्रमांक मिळवला.



शहरी विभागात डी.पी. ग्रुप, नवेनगर महाड यांनी साकारलेल्या रायगड, राजगड आणि त्यामधील घाटवाटा या संकल्पनेला प्रथम क्रमांक मिळाला. रायरी ग्रुप, नवेनगर यांनी द्वितीय, जय शिवराय ग्रुप, काकरतळे यांनी तृतीय, शिवराय मित्र मंडळ, चांभारखिंड यांनी चतुर्थ, तर शेवरीखालचा बावा मंडळ, दादली यांनी पाचवा क्रमांक पटकावला.सर्व विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमात व्याख्याते प्रतीक कालगुडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गविज्ञानाचे महत्त्व विशद केले. मंडळाचे कार्यवाह योगेश भागवत यांनी प्रास्ताविकातून मंडळाचा इतिहास, आजवर राबविण्यात आलेले विविध उपक्रम आणि गडकिल्ले बांधणी स्पर्धेमागील उद्देश स्पष्ट केला. मंडळातर्फे यंदा प्रथमच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जानेवारी महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या किल्ले रायगड गडारोहण स्पर्धेची माहितीही यावेळी देण्यात आली.या पारितोषिक वितरण समारंभाला मंडळाचे अध्यक्ष त्रिंबक पुरोहित, निशांत देशमुख, सदस्य, स्पर्धक आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुलींनी आंध्र प्रदेशला १८ गुणांनी धुतले | **मुलांकडून हिमाचल प्रदेशचा २० गुणांनी धुव्वा**

राष्ट्रीय खो-खोत महाराष्ट्राची धडाकेबाज दुहेरी विजयी सलामी

। गुजरात । वृत्तसंस्था ।

राष्ट्रीय खो-खोच्या मैदानावर महाराष्ट्राच्या मुला-मुलींनी एकाच दिवशी विजयाचा दुहेरी धमाका केला! पारुल विद्यापीठ, गुजरात येथे सुरू असलेल्या ४५ व्या ज्युनिअर राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धे त महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी साखळी सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांना निष्प्रभ करत दिमाखदार विजय नोंदवले.

मुलींच्या संघाने आंध्र प्रदेशचा ३०-१२ असा १८ गुणांनी, तर मुलांच्या संघाने हिमाचल प्रदेशचा ३८-१८ असा २० गुणांनी धुव्वा उडवला.

मुलींच्या अ गटातील सामन्यात महाराष्ट्राने आंध्र प्रदेशचा ३०-१२ असा एक डाव आणि १८ गुणांनी पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षणाचा निर्णय घेतलेल्या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवले. म हाराष्ट्राच्या विजयात श्वेता नवलेने १ मिनिट ३० सेकंद नाबाद संरक्षणासह तब्बल १० गुणांची कमाई करत निर्णायक भूमिका बजावली. धनश्री कंकने ३ मिनिटे १० सेकंद संरक्षण आणि चार गुण, तर मैथिली पवारने ३ मिनिटे १० सेकंद संरक्षण व दोन गुण मिळवत विजयाला भक्कम आधार दिला. वेदिका तामखडेने २ मिनिटे २० सेकंद संरक्षण, स्नेहा लामकानेने चार गुण, तर नंदिनी सिसोदियाने दोन गुण मिळवत संघाच्या विजयात मोलाची भर घातली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी संरक्षणात तब्बल आठ बोनस गुण मिळवत आपली क्षमता सिद्ध केली. आंध्र प्रदेशकडून एम. डी. लक्ष्मी, एम. वाय. श्री, नेक्कलापुडी आणि ताडिथला प्रिया यांनी प्रत्येकी दोन गुण मिळवले; मात्र महाराष्ट्राच्या एकत्रित खेळापुढे त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले.



मुलांच्या ब गटातील सामन्यात महाराष्ट्राच्या संघाने हिमाचल प्रदेशवर ३८-१८ असा एक डाव आणि २० गुणांनी दणदणीत विजय मिळवला. वैयक्तिक चमकदार कामगिरीसोबतच सांघिक समन्वयाच्या जोरावर म हाराष्ट्राने एकतर्फी विजय साकारला. महाराष्ट्राकडून ताबरेज खानने सर्वाधिक १० गुण मिळवत आक्रमणात धडाका उडवला. हरदाय वसावेने २ मिनिटे ३० सेकंद संरक्षण आणि सहा गुण, तर जितेंद्र वसावेने २ मिनिटे ५० सेकंद व दोन मिनिटे संरक्षणासह चार गुण मिळवत विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)